रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १३७
www.ramprahar.com

मंगळवार, ३ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

अलिबाग खूनप्रकरणी आरोपींना पोलीस कोठडी/२

बोरघाटात दोन कारची समोरासमोर धडक/५

अंडर १९ आशिया चषकात भारताचा दणदणीत विजय/८

## मुख्यमंत्री भाजपचा होणार -खासदार सुनील तटकरे



**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री भाजपचा होईल हे परवा केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या बैठकीत निश्चित झाले आहे. कोणत्या पक्षाला किती आणि कोणती खाती असतील यावर अद्याप कुठलीही चर्चा झाली नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले, अमित शाह यांच्यासोबत अजित पवार यांची स्वतंत्र बैठक होण्याची गरज मला वाटत नाही. दोन पक्ष पुढे जातील या बातमीत अजिबात तथ्य नाही. आम्ही तिन्ही पक्ष म्हणूनच आगामी काळात पुढे जाणार आहोत. एकनाथ शिंदे यांची नाराजी कोणावर असण्याचा प्रश्न नाही. त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यामुळे या चर्चा तथ्यहीन आहेत. ५ डिसेंबरला नवीन सरकारचा शपथविधी होईल, पण कुणाच्या वाट्याला किती मंत्रिपद येतील याबाबत अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही.

# माझ्या उपमुख्यमंत्रिपदाबाबतच्या बातम्या निराधार अन् बिनबुडाच्या

### खासदार श्रीकांत शिंदे यांची स्पष्ट प्रतिक्रिया

**ठाणे : प्रतिनिधी**

महायुतीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपदासाठी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा असल्याचे बोलले जात आहे, मात्र स्वतः खासदार शिंदे यांनी या सर्व घडामोडींबाबत एक्स (ट्विटर) अकाउंटवरून पोस्ट करत प्रतिक्रिया देत या सर्व बातम्या निराधार आणि बिनबुडाच्या असल्याचे म्हटले आहे.



खासदार शिंदे यांनी म्हटलेय की, महायुतीच्या सरकारचा शपथविधी थोडा लांबल्यामुळे सध्या चर्चा आणि अफवा यांचे पीक फोफावले आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दोन दिवस गावी जाऊन विश्रांती घेतली. त्यामुळे अफवांना अधिकच बहर आला. मी उपमुख्यमंत्री होणार अशा बातम्या प्रश्नचिन्हे टाकून गेले दोन दिवस दिल्या जात आहेत. वस्तूतः यात कोणतेही तथ्य नसून माझ्या उपमुख्यमंत्रिपदाबाबतच्या सर्व बातम्या निराधार आणि बिनबुडाच्या आहेत.

लोकसभा निवडणुकीनंतरही मला केंद्र सरकारमध्ये मंत्रिपदाची संधी होती, मात्र पक्षसंघटनेसाठी काम करण्याचा विचार करून मी तेव्हाही मंत्रिपदाला नकार दिला होता. सत्तेतल्या पदाची मला कुठलीही लालसा नाही. राज्यातील सत्तेत कोणत्याही मंत्रिपदाच्या शर्यतीत मी नाही, हे पुन्हा एकदा स्पष्ट करतो. माझा लोकसभा मतदारसंघ आणि शिवसेना या पक्षासाठीच नेटाने काम करणार आहे. माध्यमांचा उत्साह आणि स्पर्धा आम्ही समजू शकतो, परंतु बातम्या देतांना त्यांनी वास्तवाकडे पाठ फिरवू नये, अशी माझी विनंती आहे. माझ्यासंदर्भातल्या चर्चांना आता तरी पूर्णविराम मिळेल अशी माफक अपेक्षा, असेही खासदार शिंदे यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, या संदर्भात यापूर्वीच काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही भूमिका मांडली होती. उपमुख्यमंत्रीपद श्रीकांत शिंदेंना मिळणार अशा चर्चा आपण पत्रकारच चर्चा करत असता. या सर्व चर्चा आहेत. सत्तास्थापनेबाबत एक बैठक अमित शाह यांच्यासोबत झाली आहे. दुसरी बैठक आमची तिघांची (एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार) होईल. त्यामधून महाराष्ट्राच्या हिताचा योग्य तो निर्णय होईल, असे शिंदे म्हणाले होते.

## आशीर्वाद



**रत्नागिरी : आमदार प्रशांत ठाकूर यांनी नाणीज धर्मपीठाचे रामानंदाचार्य स्वामी श्री नरेंद्राचार्य महाराज यांची नाणीजधाम येथे सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी त्यांनी हिंदू समाजाच्या उत्थानासाठी शुभेच्छा दिल्या तसेच नुकत्याच झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीचे सरकार येण्यासाठी महाराजांनी दिलेल्या आशीर्वादाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.**

# नवीन पनवेल, कळंबोली अग्निशमन केंद्राचे पनवेल महापालिकेस हस्तांतरण

### आपत्कालीन सेवेसाठी दक्ष राहावे -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एमएमआर भागात सगळ्यात चांगल्या सुविधा पनवेल महापालिका देते याचा अभिमान आहे. आरोग्याबाबत सर्वोत्तम सेवा देणारी म्हणून या महापालिकेकडे पाहिले जाते. याच पद्धतीने मोठी उद्दिष्ट्ये ठेवून आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली मनपाच्या टीमने पनवेलकरांना अपेक्षित असलेले सहकार्य देऊन आपत्कालीन सेवेसाठी दक्ष राहावे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले.

नवीन पनवेल अग्निशमन केंद्राचे सिडकोकडून पनवेल महापालिकेस हस्तांतरण करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास आयुक्त मंगेश चितळे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, अनिल भगत, समीर ठाकूर, अजय बहिरा, प्रवीण पाटील, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खरगे, अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, हरिदास सूर्यवंशी, संदीप पाटील आदी उपस्थित होते. कळंबोली अग्निशमन केंद्राचेही सिडकोकडून पालिकेला हस्तांतरण करण्यात आले. **(पान २ वर..)**



## निडी ग्रामस्थांचा रस्ता लवकरच होणार सुरळीत

**धाटाव : प्रतिनिधी**

रेल्वे फाटक बंद केल्याने होणारी गैरसोय रेल्वे प्रशासनास लक्षात यावी यासाठी रोहा तालुक्यातील निडी ग्रामस्थांनी रविवारी कोकण रेल्वे मार्गावरील वाहतूक रोखून धरली होती. दरम्यान, रेल्वे अधिकारी व पोलिसांनी आंदोलनस्थळी भेट देत बोगद्यामधील काम पूर्ण होईपर्यंत फाटक सुरू ठेवणार असल्याचे ग्रामस्थांना आश्वासित केले. त्यानंतर या संदर्भात सोमवारी (दि. २) प्रांताधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

निडी येथील गावकऱ्यांसाठी पर्यायी मार्ग म्हणून रेल्वे प्रशासनाने बोगदा खोदून रस्ता करून दिला होता, परंतु पावसाळ्यात या बोगद्यात पावसाचे पाणी साचते. त्यामुळे ग्रामस्थांनी ये-जा करण्यासाठी अडचण होते. अशातच रेल्वे प्रशासनाने फाटक बंद केल्याने ग्रामस्थांनी रविवारी पनवेलच्या दिशेने जाणारी निजामुद्दीन एर्नाकुलम दुरांतो एक्स्प्रेस रोखून धरली व जोपर्यंत समस्येचे निरसन होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहिल असा पवित्रा घेतला. **(पान २ वर..)**

## निवडक

### फुटबॉल सामन्यात राडा; सुमारे १०० जणांचा मृत्यू

**जेरेकोर (गिनी) :** आफ्रिकन देश गिनीतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर जेरेकोर येथे रविवारी फुटबॉल सामन्यादरम्यान झालेल्या हिंसाचारात सुमारे १०० लोकांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार लबे आणि गेरेकोर फुटबॉल संघांमध्ये सामना सुरू होता. यादरम्यान मॅच रेफरीने वादग्रस्त निर्णय दिला. त्यामुळे दोन्ही संघांमध्ये हाणामारी झाली. हाणामारी होत असल्याचे पाहून प्रेक्षकही मैदानात घुसले आणि हिंसाचार सुरू केला. पोलीस ठाण्याची तोडफोड करत आग लावली.

### मनसेच्या अविनाश जाधव यांनी राजीनामा घेतला मागे

**ठाणे :** मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी रविवारी ठाणे आणि पालघर जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्यासह मनसेच्या दोन्ही जिल्ह्यातील उमेदवारांचा पराभव झाल्याने राजीनामा दिल्याचे त्यांनी म्हटले होते, मात्र पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार राजीनामा मागे घेत असल्याचे जाधव आता म्हणाले.

## काँग्रेस अध्यक्ष खरगे म्हणतात, मी पवित्र १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक

### वादग्रस्त विधानाने खळबळ; भाजपची टीका



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी रविवारी दिल्लीतील रामलीला मैदानावर झालेल्या सभेत विधान केल्याने वादाला तोंड फुटले. खर्गे यांनी स्वतःची तुलना ज्योतिर्लिंगाशी केली. खरगे म्हणाले, मी हिंदू आहे, माझे नाव मल्लिकार्जुन खरगे आहे, मी लिंग आहे, १२ पवित्र ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. खरगे यांच्या वक्तव्याचा भाजपने तीव्र निषेध केला आहे.

भाजप नेते शेहजाद पूनावाला यांनी एक व्हिडीओ जारी केला म्हटले की, हिंदू धर्माचा अपमान करणे ही काँग्रेस पक्षाची ओळख आहे. काँग्रेसने आधी श्रीरामाचा अपमान केला. काँग्रेसने श्री रामलल्ला यांच्या अभिषेकासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला नृत्य आणि गाणे म्हटले होते. काँग्रेसवाले श्रीरामाच्या अस्तित्वावर सातत्याने प्रश्न उपस्थित करीत आहेत. आता काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे भगवान शिवाचा अपमान करत आहेत. खर्गे यांनी स्वतःची तुलना १२ ज्योतिर्लिंगांशी केली आहे.

मला विचारायचे की काँग्रेस इतर कोणत्याही धर्माबद्दल अशी टिप्पणी करू शकते का? व्होटबँकेसाठी काँग्रेसची पातळी इतकी घसरली आहे की, हिंदूंच्या श्रद्धा दुखावण्याचे काम सातत्याने केले जात आहे. काँग्रेस अध्यक्षांनी माफी मागावी. जर नाव शिव असेल तर तुम्ही भगवान शिव होऊ शकत नाही. कोट्यवधी लोकांची ज्योतिर्लिंगावर श्रद्धा आहे आणि हे स्वतःला ज्योतिर्लिंग म्हणवून घेत आहेत. हा हिंदू समाजाचा मोठा अपमान आहे, असेही भाजप नेते पूनावाला यांनी म्हटले आहे.

## भाजप विधिमंडळ नेत्याची उद्या निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकत भाजप मोठा पक्ष ठरला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला १३२ जागा मिळाल्या आहेत. विधानभवनातील सेंट्रल हॉल येथे बुधवारी (दि. ४) सकाळी १० वाजता भाजप आमदारांची बैठक होणार आहे. या वेळी भाजपचा विधिमंडळ पक्षनेता निवडला जाणार आहे.

दरम्यान, भाजपने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची महाराष्ट्राचे केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या उपस्थितीत भाजपचा गटनेता निवडला जाणार आहे. भाजपच्या केंद्रीय निरीक्षकांच्या उपस्थितीत विधिमंडळ पक्षाची बैठक होणार आहे. त्यासाठी केंद्रीय निरीक्षक मंगळवारी मुंबईत दाखल होणार आहेत.

## रायगडात २८ भात खरेदी केंद्रांना मंजुरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य शासनाने रायगड जिल्ह्यात हमी भावाने भात खरेदीसाठी २८ खरेदी केंद्रावर सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या केंद्रांवर खरीप व रब्बी पणन हंगामात शेतकऱ्यांना भाताची विक्री करता येणार आहे. ५ डिसेंबरपासून जिल्ह्यात भात खरेदी सुरू होणार आहेत.

सर्वसाधारण भाताला दोन हजार ३०० रुपये प्रति क्विंटल, तर अ दर्जाच्या भाताला दोन हजार ३२० रुपये प्रति क्विंटल दर देण्यात येणार आहे. केवळ शेतकऱ्यांकडून उत्पादित झालेले नवे धान या केंद्रातून खरेदी करण्यात येणार आहे. खरेदी केलेल्या धान देय रक्कम शेतकऱ्यांना अदा करताना ऑनलाईन पद्धतीने प्रदान करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. ही रक्कम कोणत्याही परिस्थितीत धान भरडधान्य विक्री केलेल्या दिवसापासून पुढील दोन दिवसांपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली पाहिजे अशा शासनाच्या सूचना आहेत.



**कोणत्याही परीस्थितीत जास्त ओलसर किंवा बुरशीयुक्त धान विक्रीसाठी आणू नये. ते विक्री योग्य असल्याची खातरजमा केल्यावरच भाताची खरेदी करण्यात येईल.**

**-के.टी. ताटे, जिल्हा पणन अधिकारी**

भाताची खरेदी ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. खरेदी केंद्रावर भात विक्रीकरिता आणताना प्रत्येक शेतकऱ्याने सोबत आपल्या आधार कार्डाची तसेच बँकेच्या पासबुक आणणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी आपल्याकडील जमिनीबाबतचा सातबारा उताऱ्याची व गाव नमुना ८(अ) ची छायाकिंत प्रत खरेदी केंद्रावर धान विक्रीसाठी आणणे आवश्यक आहे. या उताऱ्यातील धान्य व धानाखालील क्षेत्र पाहून धान खरेदी करता येणार आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शासनाने निर्धारित केलेल्या धानाच्या आधारभूत किमती, दर्जा, खरेदी केंद्र व खरेदी केंद्रास जोडण्यात आलेली गावे दर्शविणारे फलक सर्व कृषी उत्पन्न बाजार समिती, ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय इत्यादी ठिकाणी त्यांच्या नोटीस बोर्डवर दर्शनी भागावर प्रसिद्ध करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

## चक्रीवादळामुळे हवामानात बदल, पावसाची शक्यता

**पुणे : प्रतिनिधी**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले 'फेंगल' चक्रीवादळ पुद्दुचेरीजवळील किनारपट्टीवर शनिवारी सायंकाळी आदळले. याचा परिणाम दक्षिण भारतातील तामिळनाडू, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश, केरळ राज्यांत अधिक दिसून आला. 'फेंगल' चक्रीवादळ शांत झाले असले तरी महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांवर याचा प्रभाव दिसून येत आहे. यामुळे राज्यातील हवामानात मोठा बदल झाल्याचे भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या अपडेटनुसार ६ डिसेंबरपर्यंत राज्यातील काही भागांत पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यांत विजेच्या कडकडाटासह हलक्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे. रत्नागिरी, पुणे सातारा, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांतदेखील हलक्या पावसाचा अंदाज आहे.

कोल्हापूर, कोल्हापूरातील घाट क्षेत्र, सातारा, सांगली आणि सोलापूरमध्ये ५ डिसेंबरला यलो अलर्ट देण्यात आला आहे. याचबरोबर मराठवाड्यातील लातूर आणि धाराशिवलादेखील यलो अलर्ट देण्यात आल्याचे येथे विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. या वेळी वाऱ्याचा वेग ३० ते ४० किमी प्रतितास राहिल, असेही भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे.

## सी-गलची सैर



**अलिबाग : येथील समुद्रकिनारी थंडीच्या हंगामात परदेशी सी-गल पक्ष्यांची संख्या वाढत चालली आहे. निसर्गाच्या सानिध्यात फिरण्यासाठी आलेले पर्यटक हे पक्षी पाहण्याचा आनंद आवर्जून घेतात.** (छाया : जितू शिगवण)

## राज ठाकरेंनी घेतले बल्लाळेश्वर आणि कोंडजाई देवीचे दर्शन





**पाली : प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी (दि. २) अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली येथे येऊन श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. त्याचप्रमाणे ठाकरे कुटुंबियांचे कुलदैवत असलेल्या कोंडजाईदेवीचेही दर्शन घेतले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर राज ठाकरे हे सोमवारी सकाळी पालीत दाखल झाले. त्यांचा हा खासगी दौरा असल्याचे मनसे पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या वेळी पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख जितेंद्र पाटील व कार्यकर्ते संख्येने उपस्थित होते.

# पत्रकारांकडून फडणवीसांचा सत्कार

## महामंडळ स्थापनेच्या निर्णयाबद्दल पत्रकार संघाकडून आभार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने पत्रकारांसाठी व स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्याचा ऐतिहासिक क्रांतिकारक निर्णय घेतल्याबद्दल महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

हा सत्कार राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी फडणवीस यांना साईबाबांची मूर्ती, खारीक-खोबऱ्याचा हार, डायरी, घड्याळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे किरण जोशी, सोशल मिडिया प्रमुख सिध्दार्थ भोकरे, रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे, सिंधुदुर्ग जिल्हा अध्यक्ष प्रसन्न गोंदवले, अहमदनगर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील, अकोले तालुका कार्याध्यक्ष हरिभाऊ फापाळे, मंत्रालयीन प्रतिनिधी विष्णु बुरे तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने पत्रकारांच्या विविध समस्या आणि मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी



नागपूर दिक्षा भुमी ते मुंबई मंत्रालय अशी संवाद यात्रा संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. या यात्रेदरम्यान संघाने पत्रकारांसाठी एकूण २४ मागण्या मांडल्या होत्या.

महायुती सरकारच्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापनेची मागणी मान्य करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. अखेर, सरकारने ही मागणी मान्य करत पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे पत्रकारांच्या समस्या सुटण्याची वाट मोकळी झाली आहे.

स्वतंत्र महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना आर्थिक सुरक्षा, विमा संरक्षण, तसेच विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळेल. विशेषत: ग्रामीण आणि शहरी भागातील पत्रकारांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत. यासोबतच, महामंडळाच्या माध्यमातून पत्रकारांना विविध सुविधा आणि सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना झाल्यामुळे त्यांना काही महत्त्वाच्या सुविधा मिळू लागल्या आहेत, मात्र अजूनही पत्रकार संघाच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत. यामध्ये पत्रकारांसाठी स्थिर वेतन योजना, निवृत्तीवेतन, आरोग्य विमा, अपघात विमा, विशेष गृहनिर्माण योजना, तसेच पत्रकारांच्या कुटुंबीयांसाठी शिष्यवृत्ती योजना यांचा समावेश आहे.

पत्रकार संघाने उर्वरित मागण्या तातडीने पूर्ण करण्याची विनंती सरकारकडे केली आहे. यामध्ये सर्व पत्रकारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याचा आग्रह धरण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी पत्रकार संवाद यात्रेचे एक विशेष पुस्तिका देवेंद्र फडणवीस यांना प्रदान करण्यात आली. यानंतर उपस्थितांनी महामंडळाच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी प्रभावी निर्णय घेतले जातील, असा विश्वास व्यक्त केला.या ऐतिहासिक निर्णयामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात एक नवे पर्व सुरू होणार असून, पत्रकारांचे हक्क आणि सुरक्षा सुनिश्चित होण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे. महाराष्ट्रातील पत्रकारांनी या निर्णयाचे स्वागत करत फडणवीस आणि त्यांच्या टीमचे आभार मानले आहेत.

# अलिबागचा विकास करण्यासाठी कटीबद्ध -आमदार महेंद्र दळवी

**अलिबाग : प्रतिनिधी**

आता मी सर्वच मतदारांचा आमदार आहे. सत्ताधारी पक्षातील आमदार म्हणून या मतदार संघातील सर्व जनतेचा विकास करण्यासाठी कटीबद्ध आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.




विधानसभा निवडणूकीत मोठ्या मताधिक्क्याने निवडून दिल्याबद्दल अलिबाग मतदार संघातील जनतेचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अलिबाग येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, गिरीश तुळपुळे, शिवसेनेचे दीपक रानवडे यांनीही आपले विचार मांडताना आगामी निवडणूका याच पदधतीने सर्वांना सोबत घेऊन लढण्याचा निर्धार व्यक्त केला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे हर्षल पाटील, विलास नाईक, आशीष भट, शिवसेनेचे शैलेश चव्हाण, संजीवनी नाईक आदी उपस्थित होते.

शेकापविरोधात सलग दोन वेळा आमदार होण्याचा मान इथल्या मतदारांमुळे मिळाला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका आपल्याला सर्वांना एकत्र येवून ताकदीने लढायच्या आहेत. त्यासाठी कार्यकर्त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. किंबहुना माझ्या पेक्षा अधिक ताकदीने या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लढवू असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी कार्यकर्त्यांना दिला.

शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी या वेळी आपली भूमिका आक्रमकपणे मांडली. या निवडणूकीत ज्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली त्यांना त्यांच्या कामाचे फळ मिळाले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत त्यांचाच प्राधान्याने विचार व्हायला हवा, असे त्यांनी निक्षून सांगितले. त्याचवेळी बंडखोरांना साथ देणाऱ्यांना कुठल्याच निवडणूकीत स्थान देऊ नये, असा आग्रह केणी यांनी भाजप नेतृत्वाकडे धरला.

**कुसुंबळे ग्रामपंचायतीचा मताधिक्क्याबद्दल गौरव**

मतदारसंघात सर्वाधिक मताधिक्य देणाऱ्या ग्रामपंचायतीला आमदार महेंद्र दळवी यांनी पाच लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. कुसुंबळे ग्रामपंचायतीने हा मान पटकावला आहे. या ग्रामपंचायतीत दळवी यांना १७०० इतके मताधिक्य मिळाले. त्याबद्दल ग्रामपंचायतीचा पाच लाख रुपये आणि पुषगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

# सीकेटी विद्यालयाची संगीत, चित्रकला क्षेत्रात उत्तुंग भरारी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम विभागातील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी संगीत व चित्रकला क्षेत्रात यश प्राप्त केले आहे.





इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातील आहाना वैभव बनसोडे या विद्यार्थिनीने सब ज्युनिअर गटामधून एकेरी भक्तिगीत गायन स्पर्धेत दुसरा तर इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागातील स्वर चेतन म्हात्रे याने सिनिअर गटामध्ये एकेरी भावगीत गायन स्पर्धेत विश्वज्योत शाळा खारघर, नवी मुंबई येथे आयोजित स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला तसेच इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या शिक्षिका शशिकला पाटील यांनी खुल्या शिक्षक गायन स्पर्धेत सहभागी होत तिसरा क्रमांक पटकाविला तसेच संगीत शिक्षकांसाठी असलेल्या खुला गट एकेरी भक्तिगीत गायन स्पर्धेत गुरुवर्य रूपेश मढवी यांनी तिसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळविल्याने त्यांना गौरविण्यात आले.

विजेत्यांना तबल्याची साथ देणारे संतोष खरे आणि हार्मोनियम वर स्वर साथ देणारे रूपेश मढवी सरांचे विशेष कौतुक करण्यात आले. इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागातील नृत्य स्पर्धेत सामूहिक लोकनृत्य सादर करून विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक पटकाविला, इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातील कू. अनन्या मनोज पाटील ह्या विद्यार्थीनीने ड्रॉइंग स्पर्धेत द्वितीय क्रमांकावर आपले नाव कोरले, तसेच इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागातील दर्शन नरवडे या विद्यार्थ्याने सीनिअर गटात उत्तेजनार्थ क्रमांकाचे तसेच आर्ट शिक्षक महेश पोपेटा यांनी ड्रॉईंग शिक्षक गटात उत्तेजनार्थ क्रमांकाचे बक्षिस मिळविले, ह्या स्पर्धेसाठी नवी मुंबई विभागामधून शेकडो विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती.

या विजेत्याचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्यांचे विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# पावणे येथील सार्वजनिक मुतारीची दुरवस्था

## ग्रामस्थांची कुचंबणा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत सर्वेक्षणात अव्वल स्थानी येणाऱ्या नवी मुंबई शहरामध्ये असणाऱ्या छोट्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची (मुतारी) दुरवस्था झाल्याने कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या ग्रामस्थ समोर स्वच्छतागृहाची गरज पडल्यास जायचे कुठे, अशी समस्या उभी राहत आहे.

स्वच्छतागृहामध्ये प्रवेश करायला धड जागाही नसल्याने नागरिकांना नाकावर रूमाल ठेवून त्याच ठिकाणी कार्यभाग उरकावा लागत असल्याचे चित्र आहे तसेच सध्या असणारी मुतारी मोडकळीस आली आहे.

नवी मुंबई शहरातील सार्वजनिक शौचालय सध्याच्या घडीला जशी बाहेरून देखणी आहेत तशी आतूनही स्वच्छ ठेवण्यात आली आहेत, मात्र पावणे गावात असणाऱ्या मुतारीची सध्या बिकट अवस्था झाल्याने मुतारीत कायमची अस्वच्छता असल्यामुळे त्यामध्ये जाण्यास अडचणी येतात. पाणी नसल्यामुळे येथे जाण्यास



नागरिक टाळाटाळ करीत आहेत. या स्वच्छतागृहाची नियमित साफसफाई होत नसल्याने परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे.

ही मुतारी ग्रामपंचायत काळातील असूनदेखील तिच्यात अद्याप कोणत्याच प्रकारची सुधारणा करण्यात आलेली नाही. या परिसरामध्ये पुरुष वर्गासाठी जवळपास दुसरे स्वच्छतागृह (मुतारी) नसल्यामुळे नाईलाजाने नागरिकांना याचा वापर करावा लागत आहे. पुरुषांसाठी स्वच्छतागृह असले तरी तेथेही दुर्गंधी येत असल्यामुळे त्याचा फारसा वापर कोणी करीत नसल्याची परिस्थिती आहे.

मुतारीच्या आजूबाजूला नागरी वस्ती असल्याने येथील नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. विशेष म्हणजे मुतारी मधील घाण थेट रहदारी असणाऱ्या रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना त्याचा आणखीनच त्रास सहन करावा लागतो. मनपाकडून नियमित साफसफाई होत नसल्यामुळे व देखभाल दुरुस्तीदेखील केली जात नसल्याने सध्याच्या घडीला मुतारीची बिकट अवस्था झाली आहे.

**‘पालिकेकडून कामापेक्षा फलकबाजीला प्राधान्य’**

स्वच्छता अभियान सुरू झाले की, स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी ठिकठिकाणी फलकसुद्धा लावण्यात येतात. स्वच्छ सर्वेक्षणादरम्यान छोट्या स्वच्छतागृहांची (मुतारी) नियमित स्वच्छता करण्याकडे दुर्लक्ष होत असून त्यांची दुरुस्तीही होत नाही. त्यामुळे महापालिका प्रत्यक्ष कामापेक्षा फलकबाजीला प्राधान्य देत असल्याची परिस्थिती पाहायला मिळत आहे, असे शरद जाधव यांनी सांगितले.

**पावणे एमयाडीसीमध्ये जाणारा कामगार वर्ग हा पावणे गावातूनच ये-जा करत असतो. रोज ये-जा करणाऱ्यांची संख्या ही अधिक आहे त्यामुले पुरुष कामगार वर्गाला मुतारीचा आधार घ्यावा लागतो.**
**-प्रताप कांबळे, नागरिक**

**मुतारी मोडकळीस आल्याने त्या ठिकाणी नवीन बांधकाम करून नव्याने मुतारी बांधली जाणार आहे. सफाई कामगारांना सांगून तिथं स्वच्छता केली जाईल.**
**-राजूसिंग चव्हाण, स्वच्छता अधिकारी, कोपरखैरणे विभाग**

# अलिबाग खूनप्रकरणी आरोपींना पोलीस कोठडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग समुद्र किनारी किरकोळ वादातून झालेल्या खून प्रकरणी पाच आरोपींना न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ओंकार भुकवार, विशाल वंटे, प्रथमेश घोडेकर, राज जयगडकर आणि प्रमोद साठविलकर अशी आरोपींची नावे आहेत.

शनिवारी रात्री पेण तालुक्यातील गडब गावचे मितेश पाटील आणि प्रथमेश पाटील हे वरसोली येथील जत्रेला आले होते. त्यानंतर अलिबाग समुद्र किनारी बियर पित बसले होते. त्यांच्या शेजारी आरोपीदेखील दारू प्यायला बसले होते. बियर पित असताना प्रथमेश याने हातातील बाटली दगडावर सोडली त्यात बाटली फुटून आवाज झाला. त्याचा राग येऊन आरोपींनी या दोघांना शिवीगाळ करीत मारहाणीला सुरुवात केली. वाद विकोपाला गेल्यानंतर दोघांनी तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आरोपींपैकी एकाने मितेश याच्यावर धारदार शस्त्राने वार केले त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, मात्र अतिरक्तस्त्रावामुळे त्याचा मृत्यू झाला.

अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

# हिराबाई बिनेदार यांचा स्मृतिदिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस, अनुसूचित जाती मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष तसेच माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मातोश्री दिवंगत हिराबाई चंदर बिनेदार यांचा पाचवा स्मृतिदिन शनिवारी (दि.३०) नवीन पनवेलमधील बनेदार कॉर्नरजवळ आम्रपाली बुद्धविहार या ठिकाणी ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

या वेळी बौद्धाचार्य मंगेश कलोते यांच्या हस्ते बुद्ध वंदना घेण्यात आली. सुप्रसिद्ध धम्म प्रवचनकार कल्पेश कांबळे यांचे धम्म प्रवचनही आयोजित करण्यात आले होते. त्यांनी धम्म सांगताना आईची महत्ता सांगून बौद्ध धम्मातील प्रसिद्ध मातांची उदाहरणे दिली तसेच भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष वसंत जाधव, सामाजिक कार्यकर्ते राहुल हाटे, बौद्धाचार्य अशोक मिसाळ, धम्म अभ्यासक सुरेश सोनवणे, ज्येष्ठ उपासक मोहन कंठे, बौद्धाचार्य मंगेश कलोते आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून आदरांजली वाहिली.

या वेळी ॲड. प्रकाश बिनेदारांचे समस्त कुटुंबीय, परिवार, आप्तेष्ट, मित्रमंडळी व हितचिंतक आवर्जून उपस्थित होते. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यास श्याम साळवी, ॲड. शिवकुमार कांबळे, अमोल जाधव, सुजित खंडिझोड, प्रकाश सोनावले आदी कार्यकर्त्यांनी भरपूर मेहनत घेतली.

## पान १ वरुन

### नवीन पनवेल, कळंबोली अग्निशमन केंद्राचे पनवेल महापालिकेस हस्तांतरण

या वेळी आयुक्त मंगेश चितळे म्हणाले की, पनवेल महापालिकेचा जास्तीत जास्त सुविधा देण्यावर भर असून सध्या अग्निशमन केंद्रातील कर्मचाऱ्यांना पालिका क्षेत्रातील भौगोलिक परिस्थितीनुसार रेस्क्यू ट्रेनिंग दिले जात आहे. याबरोबरच महापालिका कार्यक्षेत्रात अद्ययावत अग्निशमन सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने विविध उपकरणे पालिका लवकरच खरेदी करणार आहेत.

या अग्निशमन केंद्रांच्या हस्तांतरणाने पालिकेकडे हक्काची आता पनवेल, कळंबोली, नवीन पनवेल असे तीन अग्निशमन केंद्र झाली आहेत. आज नवीन पनवेल व कळंबोली येथील अग्निशमन केंद्रांतील प्रत्येकी दोन अग्निशमन वाहनांसमवेत हस्तांतरण करण्यात आले असून नुकत्याच झालेल्या भरतीदरम्यान पालिका अग्निशमन विभागात ११० अग्निशमन कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांना पालिका क्षेत्रातील संभाव्य धोके, नदी, इमारती या सर्वांचा विचार करून प्रशिक्षण देण्यात येत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त कैलास गावडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे यांनी मानले.

### निडी ग्रामस्थांचा रस्ता लवकरच होणार सुरळीत

एक्स्प्रेस रेल्वेगाडी तासभर रूळावर उभी असल्यामुळे आतील प्रवासी खोळंबले होते. आक्रमक ग्रामस्थांना रेल्वे अधिकारी, रेल्वे व रोहा पोलीस यांनी मध्यस्थी करून आश्वासित केले की, जोपर्यंत यावर तोडगा निघत नाही तोपर्यंत हे फाटक खुले ठेवण्यात येईल. त्यानंतर ग्रामस्थांनी रेल रोको मागे घेतला.

दरम्यान, निडी ग्रामस्थ आणि रेल्वे प्रशासन यांची सोमवारी संयुक्त बैठक घेण्यात आली. या वेळी बैठकीस उपस्थित प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी सांगितले की, पावसाळ्यात भुयारी मार्गात जे पाणी साचत होते ते काढण्यासाठी पंप बसवण्यात आले. ग्रामस्थांच्या अतिरिक्त मागणीनुसार त्या ठिकाणी जादा पंप बसवण्यात येणार आहेत, जेणेकरून पाणी सुरळीत पास होईल. त्याचप्रमाणे या विषयासंदर्भात रायगडचे दोन्ही खासदार सुनील तटकरे आणि धैर्यशील पाटील यांच्यासोबत लवकरच बैठक घेण्यात येईल.

# मुरूडमध्ये सावता माळी एकता दिंडी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड सोमवंशीय क्षत्रिय माळी समाज संकल्प युवा अभियानाला आज २५ वर्षे पूर्ण झाले असून त्याचे औचित्य साधून श्री संतश्रेष्ठ सावता माळी एकता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. दिंडीला मुरूड मसाल गल्ली येथुन सुरुवात करण्यात आली व शहरातील विविध ठिकाणी दिंडी फिरविण्यात आली.



या दिंडीत माळी समाजाचे बंधु भगिनी, लहान मुले वेगवेगळ्या पारंपारिक वेशात दिंडीमध्ये सहभागी झाले. या दिंडीमध्ये लेझीम पथक मसाल महिला मंडळ तर भोगेश्वर आळी व सुभाषचंद्र रोड शेगवाडा येथील महिलांनी भजन सादर केले. विठुरायाचे भक्त असलेले सावता माळी यांची प्रतिमा मूर्ती एका गाडीवर सजवण्यात आली होती तर जिवंत देखाव्यामध्ये श्री सावता माळी यांची भूमिका-राजेंद्र दवटे, बाळूमामा-निशांत वीरकूड, शेतकरी -ओमकार केने तर संत तुकाराम महाराजांची वेशभूषा-मंगेश पाटील यांनी साकारली.

या वेळी संकल्प युवा अभियानचे अध्यक्ष राहुल वर्तक, उपाध्यक्ष अजित चोगले, सचिव योगेश अपराध, माळी समाज अध्यक्ष महेश कारभारी, सचिव केतन वर्तक, अजित कारभारी, संजय गुंजाळ, संदीप पाटील, प्रमोद भायदे, चंद्रकांत अपराध, अजित गुरव, नंदकिशोर मसाल, अनिल वीरकूड, गणेश वर्तक, उल्हास गुंजाळ, मनीषा विरकूड, उत्कर्ष गुंजाळ, ज्योती मसाल, अक्षता पाटील यांसह सर्व पाखाडी अध्यक्ष, महिला मंडळ अध्यक्ष, तरुण मित्र मंडळ अध्यक्ष तसेच समाज बांधवांनी मोठ्या संख्येने भाग घेऊन उपस्थित होते.

## दुखवटा

### वासुदेव थोरवे



**कर्जत :** तालुक्यातील पोसरी गावातील रहिवासी ह.भ.प. वासुदेव भिकाजी थोरवे (वय ९०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी, तीन नातू एक नात असा मोठा परिवार आहे. तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते विलास थोरवे यांचे ते वडील होते.

# रसायनी रेल्वेस्थानकात सुविधांचा अभाव

## समस्या दूर करण्याची मागणी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिकीकरणाने नटलेला परिसर असून येथे विविध उद्योगधंदे आहेत. परिसरात शासकीय कार्यालय, सुख सोयीयुक्त पिल्लई इंटरनॅशनल महाविद्यालय, अर्थव्यवस्थेचे प्रशिक्षण देणारा सेबी प्रकल्प तसेच जवळूनच गेलेला मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आदींमुळे रसायनी व परिसराचा नावलौकिक आहे, परंतु येथील रसायनी रेल्वेस्थानक विविध समस्यांच्या गर्तेत असून स्थानकातील समस्या लवकरात लवकर दूर कराव्यात, अशी मागणी होत आहे.

या स्थानकावर दिवा-मुंबई, रत्नागिरी, गोव्याच्या दिशेने येणाऱ्या रेल्वे गाड्या थांबा घेतात. या स्थानकावर निवारा शेड नसल्याने प्रवाशांना भर उन्हात तर, पावसाळ्यात भिजत गाडीची वाट पहावी लागते. शिवाय प्रवाशांना बसण्यासाठी स्थानकावर बाकड्यांचीही व्यवस्था नसल्याने ताटकळत उभे राहावे लागत असतानाचे चित्र पहावयास मिळते तसेच पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था स्थानकात नसल्याने काही अंतरावर पायपीट करत जावे लागते. रेल्वे तिकिट घरही स्थानकापासून काही अंतरावर असून प्रवासी तिकिट घेऊन येईपर्यंत रेल्वे गाडी जाण्याची वेळ येते, असे प्रवाशांचे म्हणणे आहे. या स्थानकाच्या फलाटालगत वाढलेल्या गवतात मुक्त संचार दिसून येतो.

ध्वनीक्षेपक आणि माहिती यांचा मागमूसहि, या स्थानकातून प्रवाशांना कधीच ऐकायला मिळाला नाही, अशी प्रतिक्रिया प्रवाशांनी बोलताना व्यक्त केली. दरम्यान, रसायनी रेल्वे स्थानकावर सोयी-सुविधांचा बोजवारा उडाला असल्याने या स्थानकावरील समस्या सोडवाव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून जोर धरू लागली आहे.

# पनवेल, उरण तालुक्यात जंतनाशक दिन मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र-नेरे, वावंजे, अजिवली, आपटा, गव्हाण व उरण तालुक्यातील प्रा. आ. केंद्र कोप्रोली या सहा प्रा.आ. केंद्रांतर्गत ग्रामीण व शहरी भागात जंतनाशक मोहीम ४ डिसेंबर रोजी व मॉपअप राऊंड १० डिसेंबर रोजी राबविण्यात येणार आहे.


राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिम राबविण्यासंदर्भात उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांच्या अध्यक्षतेखाली तालुका आरोग्य अधिकारी पनवेल डॉ. अपर्णा पवार व तालुका आरोग्य अधिकारी उरण डॉ. राजेंद्र इटकरे, डॉ.बी.एम. कालेल वैद्यकीय अधिक्षक उरण यांच्या उपस्थीतीत उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे दालनात तालूका समन्वय समितीची सभा झाली.

या बैठकीला डॉ. अस्मीता बोंबाटकर, डॉ. आकाश वावेकर, डॉ.स्वाती अडेलकर, डॉ. सायली मानकर, व्ही आर वैदू, सुमित खेडेकर उपस्थित होते. मोहीम यशस्वी करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी यांनी दिले. ही मोहिम जिल्हा परिषद आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महिला बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग व ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार आहे.

जंताचा सामना करण्यासाठी १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला मुलींना शाळा, खासगी शाळा, अनुदानित शाळा, विना अनुदानित शाळा, अंगणवाडी, कॉलेज स्तरावर जंतनाशक गोळी देवून मुलांचे आरोग्य चांगले ठेवणे. पोषणस्थिती, शिक्षण व आरोग्याचा दर्जा उंचावणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. गावस्तरावर मोहिमेची जनजागृती करन्यात येणर आहे. अभियान यशस्वी होणेसाठी तालुक्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग राहणार आहे.


## निवडक

### पनवेलमधून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** मेहंदी शिकण्याकरिता गेलेली तरुणी घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मानसी नारायण कालोर (वय २१, रा.गावदेवी मंदिर जवळ) असे बेपत्ता मुलीचे नाव असून तिचा चेहरा सरळ, केस काळे मध्यम, नाक जाड, डोळे काळे, रंग गोरा, उंची चार फुट आठ इंच आहे. अंगात पांढरा कुर्ता व निळी जिन्स आहे. तिला हिंदी, मराठी, मारवाडी भाषा बोलता येते. या तरुणीबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा हवालदार जितीन खरात यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### एक जण हरविल्याची तक्रार



**पनवेल :** मित्रास सांगून लॉजबाहेर पडलेला एक व्यक्ती अद्याप न परतल्याने तो हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मोहम्मद हजीम अन्सारी (वय ३१) असे त्याचे नाव असून उंची पाच फुट आठ इंच, बांधा साधारण, रंग गोरा, चेहरा गोल, अंगात भगवा हाफ टी शर्ट, काळी जिन्स पॅन्ट, कमरेला छोटी बॅग, पायात सफेद लाल शुज व सोबत मोबाईल फोन आहे. त्याला हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा हवालदार संदेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सीकेटी विद्यालयात भव्य आनंद मेळावा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयात शुक्रवारी (दि.२९) भव्य आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या संचालिका वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

छोटाशिशु, मोठाशिशु व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या मेळाव्यासाठी उपस्थित बांठिया हायस्कूलचे मुख्याध्यापक माळी, चांगू काना ठाकूर मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्चमाध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी तसेच पालक प्रतिनिधी, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मेळाव्यात विद्यार्थांनी घरगुती खाद्यपदार्थ, विविध वस्तू, फळे, भाज्या व स्टेशनरी वस्तू यांचे स्टॉल लावण्यात आले. या मागे विद्यार्थ्यांचे व्यवहार ज्ञान वाढावे व त्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना घेता यावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी मनमुरादपणे खरेदीचा व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. अशा प्रकारे हा आनंद मेळावा उत्साहात झाला.

# पनवेल येथे होणार डाक अदालत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन, २ रा माळा, पनवेल मुख्य डाकघर यांचे कार्यालयाद्वारे १२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या डाक अदालतीमध्ये मुंबई रिजन विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार अथवा समस्या ज्याचे निवारण ६ आठवडा कालावधीत झालेले नाही, अश्या टपाल, स्पीडपोस्ट, काऊटर सेवा, बचत बैंक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील.

दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे. इच्छूक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतीत पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन, दुसरा माळा, पनवेल मुख्य डाकघर ४१०२०६ यांचेकडे ५ डिसेंबर २०२४पर्यंत पोहचेल अश्यारितीने पाठवावी, असे आवाहन अधीक्षक डाकघर, रायगड विभाग यांनी केले आहे.



**पनवेल : गुळसुंदे पं.स. विभागीय अध्यक्ष व सावळे ग्रामपंचायत सरपंच सुनील माळी यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, धना पाटील, यतीम पाटील, अविनाश गायकवाड, ज्ञानेश्वर सुर्वे, रोशन पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कुडावे गावातील विश्वनाथ मते यांच्या वास्तूशांतीनिमित्त आयोजित पूजेला भेट देत दर्शन घेतले. या वेळी त्यांचे मते कुटुंबियांकडून स्वागत करण्यात आले. सोबत तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी व इतर.**

# 'दिव्य कुरआन' ग्रंथाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदम इव्हच्या काळापासून महंमद पैगंबरांपर्यंत अनेक प्रेषितांनी तयार केलेला हा ग्रंथ केवळ मुस्लिमांसाठी नसून अखिल मानव जातीसाठी आहे, असे प्रतिपादन डॉ. इकबाल मिन्ने यांनी केले. ज्येष्ठ नागरिक सभागृहात नसिमा फाउंडेशन पनवेल आयोजित ए.के. शेख अनुवादित 'दिव्य कुरआन'या पवित्र ग्रंथाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते.

दूरदर्शनचे जावेद शेख आपल्या भाषणात म्हणाले, धर्मग्रंथ स्वतःच्या भाषेतून वाचला तर चांगला समजतो. कुराण हा ईश्वरनिर्मित ग्रंथ आहे. ए.के.शेख सरांनी त्याचे अचूक व सुलभ भाषांतर केले आहे. को.म.सा.प. पनवेल शाखेचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी अनुवाद, भाषांतर व रूपांतर यातील फरक समजावून सांगितला. गजल नवाज भीमराव पांचाळे म्हणाले, ए.के. शेख रसिकांचे शाहीर असून त्यांना गरिबांच्या दुःखाची जाण आहे. मराठी साहित्यातील गजलेचे दालन त्यांनी समृद्ध केले आहे. पनवेल नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला यांनी सर्व वक्त्यांच्या विधानाचा आढावा घेताना सांगितले की, सर्व धर्माचे अंतिम तत्व मानवतेचे कल्याण आहे. या वक्त्यांसोबत कय्युम मौलाना, मोहम्मद जावेद शेख, मोहम्मद अस्लम खान हे प्रमुख पाहुणेदेखील व्यासपीठावर विराजमान होते. त्यांनी कुरआराना संबंधी मौलिक माहिती दिली.

सूत्रसंचालन डॉ. समीर शेख यांनी केले. फातिमा शेख हिने 'अल फातिहा'(प्रार्थना) म्हटली. सानिया शेख हिने प्रार्थनेचा मराठी अनुवाद सादर केला. उत्सव मूर्ती ए.के.शेख यांनी प्रास्तविकात कुरआन ग्रंथाचा अनुवाद करण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांची माहिती श्रोत्यांना दिली. 'दिव्य कुरआन' या ग्रंथाचे प्रकाशक 'शब्दान्वय' प्रकाशन संस्थेचे प्रभाकर पवार यांचा सत्कार करण्यात आला. तसेच व्यवस्थापन शास्त्रात पी.एच.डी. मिळाल्याच्या निमित्ताने डॉ. समीर शेख यांना सन्मानित करण्यात आले. मुखपृष्ठकार युसुफ सर यांचादेखील सत्कार करण्यात आला.

को.म.सा.प., हास्य क्लब, ज्येष्ठ नागरिक संघ, जनजागृती ग्राहक मंच, के. गो. लिमये वाचनालय, निवृत्त सेवा संघ, सिटीजन युनिटी फोरम, मोहल्यातील नागरिक आदी या वेळी उपस्थित होते. ए.के.शेख कुटुंबीयांचे सदस्य आ य.के.शेख, वाय.के. शेख, हमीद शेख, डॉक्टर समीर शेख, इंजिनिअर साजीद शेख, विधिज्ञ सलील शेख यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. डॉ. समीर शेख यांनी सर्वांचे आभार मानले.






**उरण : विधानसभा निवडणुकीत सलग दुसऱ्यांदा विजय मिळविणारे आमदार महेश बालदी यांचे अनेकांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# गदारोळाने काय साधते?

गेला जवळपास आठवडाभर निव्वळ विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या हट्टाग्रहाखातर संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज गदारोळामुळे होऊ शकलेले नाही. सोमवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सर्वपक्षीय बैठक घेऊन जनतेच्या प्रश्नांवरील चर्चेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. त्यामुळे मंगळवारपासून तरी संसदेचे कामकाज सुरळीत सुरू होण्याची शक्यता आहे.

**विरोधी पक्षाने सरकारला खिंडीत पकडणे देशात यापूर्वीही घडले आहे. परंतु त्यासाठी विरोधी पक्षनेत्याकडे राजकीय प्रगल्भता असावी लागते. दुर्दैवाने सध्याचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे काही परिपक्व संसदपटू नाहीत. त्यामुळेच गेला जवळपास आठवडाभर संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कामकाज न होता नुसता गदारोळ होतो आहे. अमेरिकेने अदानी उद्योगसमुहावर केलेल्या आरोपांवर संसदेत चर्चा व्हावी यावर हटून बसलेल्या काँग्रेस पक्षाने दोन्ही सभागृहातील कामकाज रोखून धरण्याचा आटापिटा तेवढा गेले पाच दिवस केला. त्यांच्या या खटाटोपात यंदा तर 'इंडिया' आघाडीतील इतर घटक पक्षांचीदेखील साथ त्यांना मिळताना दिसत नाही. अदानींच्या एकाच मुद्यावरून गोंधळ घालून संसदेचे कामकाज रोखून धरणे योग्य नसल्याची भूमिका इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने यापूर्वीच जाहीर केली आहे. संभल येथील हिंसाचारावर चर्चा होण्याची गरज आहे अशी भावना समाजवादी पक्षानेही वारंवार व्यक्त केली आहे, परंतु राहुल गांधी यांना मात्र अदानींखेरीज दुसरे काहीही सुचत नसावे असेच चित्र गेले काही दिवस निर्माण झाले होते. वास्तविक राहुल गांधी यांच्याकडून अदानींवर वरचेवर असा जोरदार आरोपांचा हल्ला चढवला जात असताना त्यांच्याच पक्षाचे सरकार असलेल्या राज्यांमध्ये अदानींसोबत करार कसे काय केले गेले याचे उत्तर मात्र या पक्षाकडून कधीही दिले जात नाही. अदानींकडून त्यांच्या ठेवीदारांचे कोणत्या स्वरूपाचे नुकसान झाले आहे याचेही उत्तर ना अमेरिकेकडून दिले जाते आहे ना राहुल गांधी यांच्याकडून. असे असताना ज्या संसदीय अधिवेशनावर जनतेच्या खिशातून लाखो रुपये खर्च होत असतात, त्या संसदीय कामकाजात अडथळे निर्माण करून विरोधी पक्ष नेमके काय साधतात? आताच्या घडीला तर विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीतीलच काँग्रेस खेरीजच्या अन्य पक्षांना इतर विषयांवर चर्चा हवी आहे. तृणमूल काँग्रेस पक्षाला बांगलादेश, महागाई, नोकऱ्या, संविधान आदी विषयांवर चर्चा हवी असून अदानी प्रश्नावर कामकाज रोखून धरणे योग्य नाही असे मत त्या पक्षाकडून यापूर्वीच व्यक्त करण्यात आले आहे. समाजवादी पक्ष संभल हिंसाचारावर चर्चेची गरज अधोरेखित करतो आहे. या अशा पार्श्वभूमीवर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सोमवारी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची सर्वपक्षीय बैठक घेतली व सुदैवाने या बैठकीत संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्यावर अखेर एकदाचे सर्व पक्षांचे एकमत झाले. त्यामुळे बहुदा उद्या मंगळवारपासून संसदेचे कामकाज सुरळीत चालेल अशी अपेक्षा आहे. लोकसभा अध्यक्षांनी सर्व पक्षांच्या सदस्यांना सभागृहाचे कामकाज सुरळीत चालू देण्याकरिता सहकार्य करण्याची विनंती केली आहे. त्यांच्या या आवाहनाला सोमवारच्या सर्वपक्षीय बैठकीत तरी सर्व पक्षांच्या प्रतिनिधींनी सहमती दर्शवत सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहातील कामकाजासमोरचा अडथळा दूर होण्याची शक्यता दिसते आहे. जनतेच्या प्रश्नांवर चर्चा व्हावी यासाठी संसदीय अधिवेशन बोलावले जाते. अशी चर्चाच जर तिथे होणार नसेल तर या अधिवेशनाचा उद्देश कसा साध्य होणार?**

# जागतिक दिव्यांग दिन

आज जागतिक दिव्यांग दिन. हा दिवस दरवर्षी ३ डिसेंबर १९९२पासून जगभरात साजरा केला जातो. समाजातील प्रत्येक घटकांनी दिव्यांगांच्या प्रति केवळ सहानुभूती न दाखवता त्यांना संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने अशा व्यक्तींच्या समस्या समजावून घेता याव्यात याबाबत समाजात जनजागृती व्हावी, दिव्यांगांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांच्या उद्धारासाठी मदत मिळावी म्हणून या दिवसाची योजना आहे.

२० सप्टेंबर १९५९ रोजी बेल्जियम या देशामधील एका मोठ्या कोळशाच्या खाणीत भीषण स्फोट झाला. या खाणीमध्ये लाखो मजूर काम करीत होते. घडलेल्या दुर्घटनेमुळे हजारो मजूर कोळशाच्या खाली गाडले गेले, तर हजारो लोक मृत्युमुखी पडले. मरण पावलेल्या किती तरी जास्त पटीने लोक जखमी झाले. कित्येक मजुरांचे हात-पाय तुटले, तर कोणाचे कान कायमचे बधीर झाले. कोळशाच्या धुरामुळे अनेक लोक कायमचे अंध झाले होते.

बेल्जियममध्ये घडलेल्या या घटनेमुळे खाणीत मरण पावलेल्या कुटुंबाना तेथील नियमानुसार नुकसानभरपाई मिळाली, मात्र जे लोक जखमी व ज्यांना कायमचे अपंगत्व आले होते त्यांना कसल्याही प्रकारची मदत कोळसा खाण मालकाने दिली नाही. बेल्जियम सरकारनेदेखील याबाबत कसलीही मदत दिली नाही. कायमस्वरूपी विविध अपंगत्व आल्याने भरपाई तर मिळाली नाही, त्याचबरोबर त्यांचा रोजगारदेखील बुडाला. त्यामुळे या मजुरांचा प्रश्न ऐरणीवर आला. या खाणीत काम करणारे मजूर मरण पावले तरच नुकसान भरपाई मिळत असे, मात्र कोळसा खाणीत काम करीत असताना कोणी मजूर जखमी किंवा अपंग झाला तर त्याला नुकसानभरपाई मिळत नसे. त्यामुळे सर्वच खाणीत काम करणारे मजूर एकत्रित झाले आणि त्यांनी खाणमालकाच्या विरोधात देशात प्रचंड मोठे आंदोलन उभारले. या आंदोलनात अपंगत्व आलेल्या कामगारांना नुकसानभरपाई मिळावी व अपघात विमा लागू करावा, अशी मागणी समोर आली. अशा प्रकारचे दिव्यांगाच्या मागणीसाठी उभारले गेलेले हे जगभरातील पहिले आंदोलन ठरले. शेवटी कोळसा खाण मालक व बेल्जियम सरकारला या शारीरिक नुकसान झालेल्या लोकांच्या आंदोलनाची दखल घ्यावी लागली व त्यांना



योग्य तो मोबदला द्यावा लागला.

संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९८३ ते १९९२ हे दशक दिव्यांगासाठी अर्पण करण्यात आले होते. जगभरातील संपूर्ण देशांत या दशकामध्ये दिव्यांगांच्या उद्धारासाठी योजना राबविण्यास भाग पाडले गेले. या दशकाच्या शेवटी ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याबाबत या दिवसाची निवड करण्यात आली. १९९२च्या ३ डिसेंबरपासून जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो. आरपीडबल्यूडी कायद्यानव्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६नुसार अपंग या शब्दाऐवजी आता दिव्यांग असा शब्द बदल करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही सुधारणा केली. तेव्हापासून ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन म्हणूनदेखील ओळखले जाते.

महाराष्ट्र शासनाने दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र राज्य हे दिव्यांगासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे. दिव्यांगांचे शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसनाच्या योजना लाभार्थीपर्यंत सहज व सुलभपणे पोहचवण्यासाठी या विभागाची मदत होणार आहे.

दिव्यांग दिनाच्या निमित्ताने सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे दिव्यांग व्यक्तीदेखील सहजतेने कार्य करू शकतात. दिव्यांगत्वावर मात करून यशस्वी होता येते यासाठी प्रोत्साहनाची गरज असते हे दाखवून देण्यासाठी त्यानिमित्ताने समाजामध्ये जनजागृती व्हावी याकरिता या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये विविध क्रीडा स्पर्धा, प्रभात फेरी, व्याख्याने, भाषण अशा कार्यक्रमांचे आयोजन करून दिव्यांग व्यक्तींचा सन्मान केला जातो. त्यांच्याविषयी समाजातील घटकांमध्ये जनजागृती करण्यात येते. **(साभार : इंटरनेट)**

# भोपाळ वायू दुर्घटना

३ डिसेंबर १९८४ या दिवशी मध्य प्रदेशातील भोपाळ या शहरात युनियन कार्बाइड (इंडिया) लि.या कंपनीत अत्यंत विषारी असा मिथाईल आयसोसायनाईट पेस्टिसाईड (एमआयसी) वायुच्या ४० टन गळतीमुळे दुर्घटना घडली. जवळपास तीन हजार लोकांचा या दुर्घटनेशी निगडित आजारांमुळे मृत्यू ओढवला, तर २० हजार जण जखमी अथवा अपंग झाले.

युनियन कार्बाईड इंडिया लि.हा एकोणीसशे सत्तरच्या दशकात भोपाळमधला एक महत्त्वाचा प्रकल्प होता. अमेरिकन मल्टिनॅशनल कंपनीची ही भारतातील सबसिडियरी. इथे 'सेव्हिन' (कार्बारिल) नावाचे एक कीटकनाशक मिथाईल आयसोसायनाइट (एमआयसी) व इतर काही द्रव्यांपासून बनविले जात असे. द्रव स्थितीत असलेला मिथाईल आयसोसायनाइट वायुरूप अवस्थेत अत्यंत विषारी असल्याची पूर्ण कल्पना अमेरिकन तसेच भारतीय कंपनीला होती. एमआयसीचे रूपांतर वायूत होऊ नये म्हणून जमिनीखालच्या थंड टाक्यांमधून तो द्रव साठवला जात असे. अशा तीन टाक्या जमिनीखाली होत्या. त्यापैकी एका टाकीमधून द्रव एमआयसीचे गॅसमध्ये रूपांतर झाले.

२ डिसेंबर १९८४च्या रात्री नाईट पेट्रोलिंग युनिटने जवळच्या पोलीस कंट्रोल रूमला रात्री १.२५च्या सुमारास पहिली बातमी कळवली की, कसलासा वायू पसरला आहे आणि लोक घाबरून पळत आहेत. वायुगळती युनियन कार्बाईडमधून होत असल्याचाही संदेश पोहचला. युनियन कार्बाईडच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू झाला, परंतु एकही जबाबदार अधिकारी सापडेना. रात्री दोनच्या सुमारास कंट्रोल रूममधील फोन सतत खणखणू लागले आणि पोलीस केवळ एवढीच माहिती देऊ शकत होते की, शहरात वायुगळती झाली आहे आणि पाण्याचा वापर केल्यास होणारा त्रास कमी होऊ शकेल, मात्र हा वायू इतका विषारी असल्याची कल्पना यंत्रणेलाच नसल्यामुळे केवळ लोकांमधली भीती दूर करणे आणि पळणाऱ्यांची सुरक्षितता एवढीच बाब प्रामुख्याने त्या रात्री विचारात घेतली जात होती. सकाळ उजाडली. सकाळी सहा-साडेसहा वाजेपर्यंत या घटनेची तीव्रता लक्षात आली. मृत्यूने घातलेले थैमान लक्षात येऊ लागले. लोक मृत अथवा घायाळ शरीरे भोपाळ मेडिकल कॉलेजच्या आवारात पोस्टमॉर्टेमसाठी आणून टाकू लागले. या परिस्थितीत नेमक्या इलाजाबाबत डॉक्टरांमध्येही संदिग्धताच होती.

१६ डिसेंबर १९८४पासून 'ऑपरेशन फेथ' हाती घेण्यात आले. कंपनीपासून दूरवरच्या कॅम्प्समधून लोकांची व्यवस्था करण्यात आली, मात्र या ऑपरेशनपूर्वीच जुन्या भोपाळमधील बरेच लोक उठून निघून गेले होते. १६ डिसेंबरला सकाळी ९ वाजता 'ऑपरेशन फेथ' सुरू झाले. या प्रक्रियेदरम्यान कंपनीच्या आजूबाजूला सर्वत्र पाणी टाकण्यात येत होते. वायुदलाच्या हेलिकॉप्टर्समधूनही सतत पाण्याचा शिडकावा कंपनीवर होत राहिला. लोकांच्या मनात विश्वास उत्पन्न व्हावा म्हणून मुख्यमंत्र्यांसह सगळा अधिकारी काफिला ऑपरेशनदरम्यान कंपनीमध्येच दिवसभर राहत होता आणि २२ डिसेंबरच्या संध्याकाळी 'ऑपरेशन फेथ' संपले.

भोपाळच्या वायू दुर्घटनेवर 'भोपाल एक्सप्रेस' नावाचा महेश मथाई यांनी दिग्दर्शित केलेला हिंदी चित्रपट १९९९मध्ये निघाला. त्यात नसिरूद्दीन शाह यांच्या व्यतिरिक्त के.के. मेनन व नेत्रा रघुनाथन यांनी कामे केली आहेत, तर नोव्हेंबर २०२३मध्ये या घटनेवर रेल्वे मेन ही वेब सिरीझ प्रदर्शित झाली. (साभार : इंटरनेट)




## कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'डेथ क्लॉक'

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सध्या सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. विज्ञान-तंत्रज्ञान यासोबत आरोग्य आणि आर्थिक क्षेत्रातील भविष्यातील शक्यता जाणून घेण्यासाठी देखील कृत्रिम बुद्धिमत्ता वापरली जात आहे. यादरम्यान आता कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित एक ॲप सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. 'डेथ क्लॉक' नावाचे हे ॲप वापरकर्त्याच्या दैनंदिन जीवनातील सवयींच्या मदतीने त्याच्या आयुर्मानाबद्दल अंदाज व्यक्त करते. विशेष बाब म्हणजे जुलैमध्ये लाँच झालेले हे ॲप तेव्हापासून १२५,०००हून अधिक वेळा ते डाऊनलोड करण्यात आले आहे.




एखाद्याच्या शिल्लक राहिलेल्या आयुष्याबद्दल अंदाज व्यक्त करणारे हे 'डेथ क्लॉक' ब्रेंट फ्रान्सन यांनी विकसीत केले आहे. डेथ क्लॉक हे ॲप १२,००हून अधिक आयुर्मानासंबंधी अभ्यासांचा विस्तृत डेटाबेस आणि ५३ दशलक्ष सहभागी व्यक्ती यांचा वापरातून हा अंदाज व्यक्त करते. त्याचप्रमाणे तुमचा आहार, व्यायाम, तणावाची पातळी आणि झोपेचे पॅटर्न्स या सगळ्यांचा अंदाज घेऊन हे ॲप तुमच्या मृत्यूची तारखेसंबंधी अंदाज व्यक्त करते.

सध्या या ॲपला सध्या चांगलीच प्रसिद्धी मिळताना दिसत आहे. डेथ क्लॉक हे ॲप तुम्हाला कोणत्या सवयी सुधारण्याची आवश्यकता आहे याबद्दल सल्ला देते, पण या ॲपचा वापर फक्त मृत्यूची तारीख जाणून घेणे किंवा तुमच्या आरोग्य सुधारणे इतका मर्यादित नाही. याचे इतरही अनेक उपयोग समोर येत आहेत.

तुमच्या भविष्यातील आर्थिक नियोजनासाठी देखील तुमचे आयुर्मान किती राहिल हे माहिती असणे उपयोगी ठरते. याच्या आधारावर सरकार आणि विमा कंपन्या जीवन विमा आणि पेंशन फंड पॉलिसी कव्हरेजचे मोजमाप करतात तसेच तुमचे आययुर्मान किती राहील आणि तुम्ही किती वर्षे निरोगी जगू शकता हे माहिती असल्याने तुम्ही भविष्यातील गुंतवणूक आणि बचत याचा ताळमेळदेखील बसवू शकता. त्याचप्रमाणे निवृत्त होताना तुमचे उत्पन्न किती असावे तसेच तुमच्या इतर आर्थिक नियोजनात याचा फायदा होऊ शकतो. विशेष बाब म्हणजे जुलैमध्ये लाँच झालेले हे ॲप तेव्हापासून १२५,०००हून अधिक वेळा ते डाऊनलोड करण्यात आले आहे.

# भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद

डॉ. राजेंद्र प्रसाद हे स्वतंत्र भारताचे पहिल्या राष्ट्रपती होते. बिहारच्या एक साधारण गावातून 'भारतरत्न' या देशाच्या सर्वोच्च नागरिक सन्मानाची प्राप्ती केलेले हे व्यक्तिमत्व होते. ते सलग १२ वर्षे राष्ट्रपतिपदावर आरूढ झालेले भारताचे पहिले राष्ट्रपती होते. खरोखरच ते अजातशत्रू होते. त्यांचे संपूर्ण नाव डॉ. राजेंद्र प्रसाद महादेव सहाय असे होते, परंतु त्यांचे आडनाव 'सहाय' हे कुणाला फारसे परिचित नाही. डॉ. राजेंद्र प्रसाद या नावानेच ते सर्वत्र ओळखले जातात.



**निमित्त**

बिहारच्या सारन जिल्ह्यातील जिरादेई या लहानशा खेड्यात श्रीवास्तव या कुटुंबात ३ डिसेंबर १८८४ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा चौधुरलाल हे हथवा संस्थानचे दिवाण होते, तर वडील महादेव सहाय हे जमीनदार होते. ते संस्कृत व फारसी भाषेचे तज्ज्ञ होते तसेच आर्य व युनानी या दोन्ही पद्धतीची वैद्यकी करीत असत. राजेंद्र प्रसादांची आई कमलेश्वरीदेवी ही आर्य संस्कृती व जुन्या परंपरेतील सात्त्विक व धार्मिक वृत्तीची स्त्री होती. ती राजेंद्र प्रसादांना त्यांच्या लहानपणी रामायण महाभारतातील कथा सांगत असे. विशेषतः रामकथेचा राजेंद्र प्रसादांच्या मनावर विशेष परिणाम झाला होता. राजेद्रप्रसादांच्या आईचे निधन झाल्यावर त्यांचा सांभाळ त्यांच्या मोठ्या बहिणीने केला आणि वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे पालनपोषण व शिक्षण त्यांचे मोठे काका (चुलते) महेंद्र प्रसाद यांनी केले. मार्गदर्शन थोरले भाऊ महेंद्रबाबू यांनी केले.

डॉ. राजेंद्र प्रसादांच्या गावात एकही प्राथमिक शाळा नव्हती. त्यामुळे त्यांना शिकवण्यासाठी एका मुसलमान मौलवीची नेमणूक करण्यात आली. बालपणी घरातच शिक्षणाला सुरुवात झाली. त्या वेळी राजेंद्रबाबूंचे पाचवे किंवा सहावे वर्ष असेल. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर राजेंद्रबाबूंना छपरा येथील शाळेत इंग्रजी शिकण्याठी धाडण्यात आले. १९०२मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले, तेव्हा त्यांचे वय १७ वर्षांचे होते. उच्च शिक्षणासाठी कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात त्यांनी प्रवेश घेतला आणि ते बीएची परीक्षा उत्तीर्ण झाले. कलकत्ता विद्यापीठातून एमएची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १९०८मध्ये त्यांनी मुझफ्फरपूरच्या ब्राह्मण कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापनकार्य केले. काही काळ ते या कॉलेजच्या प्राचार्यपदावरही राहिले, परंतु त्यांचे अध्यापनात फारसे मन रमले नाही. त्यामुळे त्यांनी वकील होण्याचे ठरविले. १९१५ साली ते मास्टर ऑफ लॉज ही परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. पुढील दोन वर्षांत त्यांनी डॉक्टर ऑफ लॉज ही कायद्याची सर्वोच्च पदवी मिळवली. त्यामुळे त्या दिवसापासून ते कायमचे 'डॉ. राजेंद्रप्रसाद' झाले.

१९२४मध्ये डॉ. राजेंद्रबाबूंची पाटणा महापालिकेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. राजेंद्रबाबूंची त्या काळची कमाई सालीना तीस ते चाळीस हजारांवर होती, पण देशसेवेसाठी त्यांनी वकिली सोडली आणि आजन्म फकिरी पत्करली. स्वातंत्र्य चळवळीतील लाला लजपतराय, अरविंद्र घोष आणि मदनमोहन मालवीयांसारख्या नेत्यांच्या विचाराने ते प्रभावित झाले. पुढे एखाद्या लोहचुंबकासारखे राजेंद्रबाबू गांधीजीकडे आकर्षिले गेले. १९४२च्या 'छोडो भारत' आंदोलनात त्यांनी तुरुंगवास भोगला.

राजेंद्रप्रसाद यांना देशाचे हंगामी राष्ट्रपती म्हणून निवडण्यात आले. सलग १२ वर्षे राष्ट्रपतिपदावर विराजमान झालेले ते आतापर्यंतचे एकमेव राष्ट्रपती म्हणावे लागतील. २८ फेब्रुवारी १९६३ रोजी पाटणा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात त्यांचे व्याख्यान होणार होते, पण न्यूमोनियामुळे ते या समारंभाला जाऊ शकले नाहीत. त्याच दिवशी रात्री सव्वादहा वाजता त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

**क्लिक...क्लिक...!**



अलिबाग : वीकेण्डला असंख्य पर्यटकांनी समुद्रकिनारा गजबजला होता. (छाया : जितू शिगवण)

## आरोग्य प्रहर

### जीवनशैली बदला आणि वंध्यत्व टाळा!

मुलींमध्ये वंध्यत्वाचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. याला फक्त महिलाच कारणीभूत नसतात, तर पुरुषांमध्येही कमतरता असू शकते. बदललेली जीवनशैली, व्यायामाचा अभाव, पोषण आहाराची कमतरता, जागरण, हार्मोन्समधील बिघडलेले संतुलन अशी अनेक करणे वंध्यत्वास कारणीभूत ठरतात. शरीरात घडणारे बदल हा मुख्य घटक आहेच, पण जीवनशैलीतही बदल करण्याची गरज आहे. वंध्यत्वाचे वाढते प्रमाण, त्यामागील कारणे यावर डॉ. स्वाती डबरासे यांनी प्रकाशझोत टाकला.



शरीरातील अंतर्गत बिघाडामुळे वंध्यत्व येऊ शकते. साधारण दहावी, बारावीपर्यंत मुली-मुलांच्या पोषण आहारावर पालकांचे लक्ष असते, मात्र मुले-मुली महाविद्यालयात जाऊ लागतात, तेव्हा त्यांची जीवनशैली बदलते. सकाळचे महाविद्यालय असेल तर घाईघाईत नाष्टा होत नाही. नंतर भूक लागल्यावर रस्त्यावरील खाद्यपदार्थ खाल्ले जातात. महाविद्यालय शिक्षण तसेच नोकरी करताना एक ताण असतो. त्याचाही परिणाम शरीरावर होतो.

पुरेसा व्यायाम होत नाही. किमान दोन तास तरी शारीरिक कसरती केल्या पाहिजेत. रात्री उशिरा मोबाईलमध्ये रमणे टाळले पाहिजे. मैदा, गोड पदार्थ, चिप्स, तळलेले पदार्थ खाण्याचे टाळावे. पाळी नियमित होत नसल्यास रक्त तपासणी आणि सोनोग्राफी करून घ्यावी.

मेंदूपासून अंडकोशापर्यंत एक सिस्टीम कार्यरत असते. हे चक्र बिघडले की अंडकोशावर सूज येते. त्यामुळे पाळी नियमित होत नाही. शरीरावर परिणाम दिसू लागतात. वजन वाढते. काही महिलांचे केस गळतात, चेहऱ्यावरील केस वाढतात, मुरुमे येतात, चेहऱ्यावर काळपटपणा येतो. ही लक्षणे दिसतात त्यास पॉलिसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम असे म्हणतात.

अंडकोशात बुडबडे तयार होतात. अंडकोशाचा आकार वाढतो, पाळी नियमित येत नाही. त्यातून मग अनेक समस्या निर्माण होतात. त्यास पॉलिसिस्टिक ओव्हरी डिसिज असे म्हणतात.

लग्नानंतर स्त्री आणि पुरुषात शारीरिक संबंध होऊन वर्षभरात बीजधारणा होत नसेल तर काहीतरी समस्या असते. फक्त महिलांमध्ये समस्या असू शकते असे नाही, तर पुरुषांमध्येही असू शकते. कधी कधी टबमध्ये ब्लॉक असतो. हार्मोन्समधील संतुलन बिघडते. त्यामुळे बीजनिर्मिती होत नाही.

# खालापुरात घडफोडीचे सत्र

## घोडीवली येथे दोन घटना ▌ पोलिसांकडून तपास सुरू



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील घोडीवली गावामध्ये २ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास दोन घरांची घरफोड्या झाल्याने घोडीवली गावकऱ्यांसह परिसरातील नागरिक भीतीच्या सावटाखाली वावरत आहेत. या घटनेचा गुन्हा दाखल झाला आहे.

काही महिन्यांपूर्वी घोडीवली गावात पाच ठिकाणी घरफोडीची घटना घडली होती, परंतु त्या घरफोडीमध्ये कोणतीही मोठ्या प्रमाणात नुकसान झाली नसताना या चोरीच्या घटनेला काही दिवस उलटून गेल्यानंतर घोडीवली गावात पुन्हा २ डिसेंबरच्या पहाटेच्या सुमारास दोन बंद घराचे लॉक तोडून चोरटे घरामध्ये घुसले असून घरातील मंडळी कामानिमित्ताने बाहेर गेली असता चोरट्यांनी संधीचा फायदा घेत गणेश दुधाजी पिंगळे यांच्या घरातील कपाट तोडून काही किंमती वस्तू, गंठण, हार, चैन व काही रक्कम लंपास केल्या असून अशी माहिती घरातील सदस्यांनी दिली असून चोरट्यांनी दुसरे घर शशीकांत काळुराम पिंगळे फोडले, मात्र चोरट्यांच्या हाती या घरात काहीच लागले नाही.

या चोरीच्या घटनामुळे नागरिक भीतीच्या सावटाखाली आहेत, मात्र चोरटे शोधण्यासाठी पोलिसांनी चक्रे फिरवली असल्याचे समजते. यामुळे नागरिकांनी सतर्क करणे गरजेचे आहे.

# साजगावची यात्रा संपल्यानंतर परिसरात पसरले घाणीचे साम्राज्य

**खालापूर : प्रतिनिधी**



खालापुरातील साजगाव यात्रेच्या ठिकाणी सध्या घाणीचे साम्राज्य पसरले असून यात्रा संपून एक आठवडा उलटला असताना सुद्धा या ठिकाणची स्वच्छता करण्यास खोपोली नगरपालिका प्रशासन व कर्मचारी फिरकलेच नसल्याने घा घाणीचे साम्राज्य पसरले असून ताकई, साजगाव, सारसन, ढेकू व चार पाच गावांमध्ये माशांचे थवेच्या थवे पसरले आहेत तसेच मोठ्या प्रमाणात दुर्गंधी ही निर्माण झाली आहे.

या माशांनी भविष्यात रोगराई पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. नगरपालिकेने यात्रा व्यवस्थापन फी वसूल केली तर स्वच्छता ही करावी, अशी मागणी आसपासचे ग्रामस्थ करीत आहेत. दरम्यान, नगरपालिका यात्रेच्या माध्यमातून दहा ते पंधरा लाख वसूल करून फरार झाले असल्याचे सध्या चित्र आहे.

साजगाव यात्रा बोंबला विठोबाची यात्रा म्हणून परिचित आहे. यात्रा संपली मात्र टाकाऊ माल यात्रेच्या परिसरात तसाच पडून आहे मिठाईचे तुकडे प्लास्टिक व सुक्या मच्छीचा अवषेश मोठ्या प्रमाणात परीसरात पडले आहेत. सुकी मासळीचे अवशेष मोठ्या प्रमाणात दुकानांच्या परिसरात पडलेली असल्यामुळे विल्हेवाट न लावल्याने माशांचा त्रास तसेच दुर्गंधी पसरण्यास सुरुवात झाली आहे.

परीसरातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. जंतुनाशक पावडरची फवारणी करावी या ठिकाणची स्वच्छता करून तत्काळ जंतुनाशक पावडरची फवारणी करण्यात यावी, अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# रोह्यात नेत्रतपासणी शिबिर



**धाटाव : प्रतिनिधी**

श्री धावीर देवस्थानच्या प्रांगणात झालेल्या मोतीबिंदू तपासणी शिबिरात सोमवारी (दि. २) १४४ नेत्ररुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६६ रुग्णांना आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. रोहा सिटिझन फोरमने गेल्या दीड वर्षभरात दोन हजार पेक्षा जास्त नेत्ररुग्णांच्या मोफत आणि यशस्वी शस्त्रक्रिया केल्याने तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या कमालीची वाढली आहे.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट सातत्याने 'अंधत्वाकडून दृष्टीकडे' हे मोतीबिंदूमुक्त रोहा अभियान राबवत आहे. ट्रस्ट मार्फत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले जाते व तपासणी केल्यानंतर एका दिवसात डोळ्यांच्या शस्त्रक्रिया केल्या जात असल्याने गरजूंना दिलासा मिळत आहे. रोहा येथे श्री धावीर देवस्थान येथे शिबिर झाले.

या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटपदेखील करण्यात आले. शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, स्क्रिंटआय स्पेशालिस्ट डॉ.श्रृती मोहन, प्रतिमा गावित, अवंतिका गलांडे, नेत्रा महाडीक, विश्वास पाटील, सागर पाटील आदींनी रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक अप्पा देशमुख, महेश सरदार, संदीप सरफळे, श्रीकांत ओक, संतोष खटावकर, दिनेश जाधव, दिनेश मोहिते, उस्मान रोहेकर, अहमद दर्जी, राजेश काफरे, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, इलियास डबीर, परशुराम चव्हाण, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे, बिलाल मोरबेकर आदींनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# बोरघाटात दोन कारची समोरासमोर धडक

## एका चालकासह प्रवासी जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे जुन्या महामार्गांवर सायममाळ जवळ अवघड वळणावर हरिअर टाटा कार आणि एर्टिगा कार यांची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने भीषण अपघात झाला असून त्यातील एर्टिगा गाडीचा चालक एक गंभीर जखमी झाला आहे. त्यातील अनेक प्रवाशी जखमी झाले आहेत.

जुन्या मुंबई-पुणे महामार्गांवर बोरघाटाततून टाटा हॅरिअर कार (एमएच ०६ सीडी ९९६०) ही खोपोली वरून लोणावळा कडे जातं असताना लोणावळा वरून खोपोलीकडे येणारी एर्टिगा कार (एमएच ०३ ईएल ९११३) ही सायमाळ टाटा पॉवर जवळील वळणावर आली असता दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने भीषण अपघात झाला.

या अपघातात एर्टिगा कारमधील चालक आणि सहप्रवाशी गंभीर झाल्याने त्यांना तत्काळ खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालय पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेत. तर दोन्ही अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी चालू करण्यात आला आहे.

# वरसोली समुद्र किनाऱ्यावर होणार महाराष्ट्राचा मराठी महोत्सव

**अलिबाग : प्रतिनिधी**



वरसोली समुद्र किनाऱ्यावर महाराष्ट्राचा मराठी महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे. १८ डिसेंबर ते २२ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवाला नामवंत कलाकार आपली कला सादर करणार आहेत. या शिवाय विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे आयोजक निखिल जैन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

टुडेज युथ सोशल फाऊंडेशनच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे. महाराष्ट्रातील लाडका डिजे क्रेटेक्स आणि गायक संजु राठोड प्रथमच अलिबागमध्ये या महोत्सवाच्या निमित्ताने आपली कला सादर करणार आहेत. संस्थेच्या माध्यमातून वर्षभर राबविल्या जाणाऱ्या विवीध कार्यक्रमांसाठी निधी उभारता यावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

वरसोली समुद्र किनाऱ्यावर क्रिकेट मैदानावार हा महोत्सव होणार आहे. सत्तर स्टॉल्स या महोत्सवात लावले जाणार आहेत. स्थानिक व्यवसायिकांना व्यवसाय संधी उबलब्ध व्हाव्यात हा या उपक्रमाच मागील उद्देश आहे. पाच दिवसात देशातील नामांकीत कलाकार, अभिनेते, गायक आणि डीजे वादक या महोत्सवात सहभागी होणार आहेत. गुलाबी साडी गाण्याचे गायक संजु राठोड, उत्कर्ष वानखेडे, सोनाली सोनावणे, अंशिका चोनकर हे आपली बहारदार गाणी सादर करणार आहेत. प्रवीण तरडे, मधुरा वेलणकर आदी अभिनेते महोत्सवाला हजेरी लावणार आहेत. कोकणी खाद्यसंस्कृतीचा आस्वाद या महोत्सवात हजेरी लावणाऱ्यांना घेता येणार असल्याचे निखील जैन यांनी सांगितले.

या वेळी आदित्य जैन, विनीत भतेजा, आदिती पिंपळे, डॉ आर्या शिंदे, आर्य चौधरी, तेजस शिंदे, प्रथमेश कोटीयन, जय म्हात्रे आणि पार्थ घरत आदी उपस्थित होते.



**माणगाव : विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने चांगले यश मिळवल्याबद्दल खासदार सुनील तटकरे यांचे राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी, कॉन्ट्रॅक्टर सर्फराज अत्तार यांनी अभिनंदन केले.** (छाया : सलीम शेख)



**खोपोली : रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शशिकांत देशमुख यांची कन्या मिनल आणि सातारा जिल्ह्यातील श्रीरंग शेवाळे इनामदार यांचे चिरंजीव निलेश यांचा विवाह सोहळा झाला. या वेळी आमदार भरत गोगावले यांनी उपस्थित राहून वधू-वरास आशीर्वाद दिले.** (छाया : अर्जून कदम)

# वाहतूकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.२) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ५१० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून चार लाख ८८ हजार ७०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान, वाहतूक पोलिसांकडून दररोज बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत असते.


**जाहीर नोटीस**

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP ९१८/२०२४**

**प्रसाद राजेश कडलक** — **अर्जदार**

**विरूद्ध**

**चरानिया कंपनी** — **विरूद्ध पक्षकार**

**आणि**

**रॉयल सुंदरम जनरल इन्शु. कंपनी लि.** — **विमाकार**

**प्रति,**
**चरानिया कंपनी**
**पत्ता-** सर्वे क्र. 32.2, ए टेंभेवाडी,
खालापूर,पनवेल, महाराष्ट्र - 410 203.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **३१-०१-२०२५** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्री. सचिन बी. मुंडे** यांच्या न्यायाधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **२२-११-२०२४** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

आदेशावरून
सही/-
सदस्य
कोर्टाचा शिक्का
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१



**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**ई - निविदा सूचना**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सिडको प्राधिकरणामार्फत हस्तांतरीत कामोठे नोडमधील आरक्षित दैनिक बाजारातील दुकाने / स्टॉलधारक यांच्याकडून दैनिक बैठक शुल्क वसुल करणेकामी संस्थेची निवड करणेकरीता जाहिर ई-निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल यांचेकडून मागविणेत येत आहेत. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०२/११/२०२४
पमपा/जनसंपर्क/३१२४/
प्र.क्र.५८३/५८५/२०२४

सही/-
**अतिरिक्त आयुक्त** (।)
पनवेल महानगरपालिका



**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगाव.**
**ई-निविदा सूचना क्र. ७ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, माणगाव यांचेकडून खालील कामाकरिता ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत **फणसाड प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मुरुड जि. रायगड, जि. रायगड,** पंपिंग मशिनरीसाठी तरंगता तराफा उभारणी करणे कामाबाबत. कामाची अंदाजित किंमत **रू. १,००,९७,२००/-**

कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. ०२/१२/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक : २५/११/२०२४
आरओसी-२०२४-२५/
क्र -५/सी ४८४३

सही/-
**(एच. आर. नागदे)**
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगाव.


# समर्था रातवडकर राजभाषा हिंदी प्रारंभिक परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव येथील एस एस निकम इंग्लिश स्कूलची इयत्ता तिसरीतील विद्यार्थीनी समर्था निलेश रातवडकर ही महात्मा गांधी राजभाषा हिंदी प्रचार संस्था, पुणे द्वारा आयोजित अखील भारतीय राजभाषा हिंदी प्रारंभिक परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याने तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

समर्था रातवडकर ही लहानपणापासूनच बुद्धीने अत्यंत तल्लख असुन शाळेतील विविध स्पर्धांमध्ये ती नेहमीच सहभाग घेत असते.आई-वडीलांचे तसेच शाळेतील शिक्षक वर्ग तिला प्रोत्साहीत करीत असतात. तिने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल तिला अनेकांनी पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


**महावितरण** — **ई- निविदा सूचना**

खालील तक्त्यात रकाना क्र २ मध्ये दिलेल्या निविदाद्वारे वाशी मंडळ कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या क्षेत्राकरिता खालील नमूद केलेली कामे कंत्राटी तत्वावर देण्याकरिता या क्षेत्रातील अनुभवी कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे स्वरूप | अंदाजीत किंमत रुपयामध्ये | निविदा आणि निविदा खर्च | निविदा सदरीकरन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | SE/VC/HR/ CCFC, DSS CR & LS/ T-१७/ २०२४-२५. | वाशी मंडळाच्या अंतर्गत केंद्रीकृत ग्राहक सुविधा केंद्र (CCFC)आणि कायदेशीर विभाग (LS) व DSS Control Room येथे कुशल व अकुशल मनुष्यबळ पुरवण्याबाबत. | रू. ६०,००,०००/- | निविदा सुरक्षा रु **३०,०००/-** निविदा शुल्क रु १०,००० + 18% GST | ०९.१२.२०२४ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

निविदा www.mahadiscom.in/eTender/etender या महावितरणाच्या संकेत स्थळावरून दिनांक ०२.१२.२०२४ ते ०९.१२.२०२४ या कालावधीमध्ये उपलब्ध असतील. निवेदेसोबत इसार्याची भरावयाची रक्कम online ई-टेन्डींगद्वारे भरून उपरोक्त तक्त्यात स्तंभ क्र.६ मध्ये दर्शविलेल्या सादरीकरणाच्या दिनांकापर्यंत किंवा तत्पूर्वी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावयात. कोणतीही किंवा सर्व निविदा रद्द करण्यापर्यंत कारणे न दाखवता तथा रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकारस राखून ठेवण्यात आलेले आहेत.

कृपया अधिक माहितीकरिता व्यवस्थापक (मासं) ,वाशी मंडळ यांच्याशी संपर्क साधावा.
भ्रमणध्वनी क्र. ९०२९१०२७५३.

**अधिक्षक अभियंता, वाशी मंडळ, वाशी.**



**उरण नगरपरिषद, उरण**
ता. उरण, जि. रायगड
**जाहीर निविदा सूचना-२०२४-२५**

उरण नगरपरिषद, उरण, यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार/पुरवठादारां कडुन दोन लिफाफा पध्दतीने सिलबंध दरपत्रक मागविणेत येत आहे.

**कामाचा विषय -** उरण नगरपरिषद कार्यालयीन कामकाज करिता संगणक व लॅपटॉप खरेदी करणेबाबत.

**इसारा रक्कम** ५०००/- रुपये **निविदा फॉर्म** - फी. २०००/-रुपये.
**कालावधी -** कार्यादेश दिलेपासुन १ महिना

**निविदा प्रसिध्द दिनांक-** ०३/१२/२०२४ सादर करणेची मुदत दिनांक ०३/१२/२०२४ ते १०/१२/२०२४ पर्यंत.

**निविदा उघडणेचा दिनांक -** १२/१२/२०२४ रोजी अथवा नगरपरिषदेच्या प्रशासकीय सोईनुसार.

**आवश्यक कागदपत्र -** १) आयकर विवरणपत्र, २) अनुभवाचे दाखला, ३) नोंदणी प्रमाणपत्र ४) जीएसटी, प्रमाणपत्र, पॅनकार्ड ५) फॉर्म फी भरल्याची पावती ६) इसारा रक्कम भरल्याची पावती.

सूचना- १) सदर निविदेबाबत तपशिलवार माहिती नगरपरिषदेच्या भांडार विभागात मिळेल.

दि. ०२/१२/२०२४
जा.क्र. उनप/कर विभाग/
६२१२/२०२४-२०२५

सही/-
**मुख्याधिकारी**
उरण नगर परिषद करिता

# तळोजा औद्योगिक क्षेत्रात वायू प्रदूषण

- परिसरातील नागरिक त्रस्त
- एअर क्वालिटी इंडेक्स मॉनिटरची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा एमआयडीसी येथील विविध कारखान्यामधून सोडण्यात येणाऱ्या विषारी वायूचा विसर्गमुळे तळोजा फेज १, फेज २ आणि परिसतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक श्वास व इतर रोगांना बळी पडत आहेत. या औद्योगिक क्षेत्रातील विषारी वायू प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना करण्यात आली आहे.

तळोजा फेस दोन येथे प्रदूषण पातळी दर्शवणारा कायमस्वरूपी इंडेक्स मॉनिटर बसवण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील काही कंपन्या रात्रीच्या वेळी विषारी वायू सोडत असल्याने परिसरातील नागरिकांचा जीव गुदमरत आहे. पहाटेच्या वेळी सोडण्यात येणाऱ्या घातक प्रदूषणाने नागरिकांना कैद्यासारखे कोंडून घ्यावे लागत आहे.

विषारी वायूने काहींना दमा आणि फुफुसाचे आजार झाले आहेत. विषारी वायू प्रदूषणाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून नागरिकांच्या आरोग्याशी जीवघेणा खेळ सुरू आहे. तळोजा औद्योगिक क्षेत्रालगत असलेल्या तोंडरे, पडघे, पेंधर, घोटगाव, देविचापाडा, खेरणे, ढोंगऱ्याचा पाडा, नावडे, रोडपाली, खिडूकपाडा या गावांबरोबर पनवेल महापालिका क्षेत्रातील – तळोजा फेस १,२, खारघर कळंबोली, खांदा कॉलनी, नवीन पनवेल आणि कामोठेतील वायुप्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस खालावत आहे.

तक्रार करूनही कंपन्यांकडून होणाऱ्या घातक वायुप्रदुषणाकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ लक्ष देत नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. या विरोधात लढा देण्यासाठी नागरिक एकवटले असून त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेवून तळोजा क्षेत्रातील कंपन्यांतून सोडण्यात येणाऱ्या विषारी प्रदूषणाबाबत चर्चा केली आणि प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर ताबडतोब कारवाई करण्याची मागणी केली. तळोजा फेस दोन येथे कायमस्वरूपी इंडेक्स मॉनिटर बसवावा, अशी मागणी करण्यात आली.

# वाशीमध्ये भाजप सदस्यत्व नोंदणी अभियान

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर मतदारसंघातील वाशी शहरातील भारतीय जनता पक्ष जनसंपर्क कार्यालयात भाजपचे सदस्यत्व नोंदणी अभियान सुरू केले आहे. या वेळी महायुतीचे कार्यकर्ते आणि जनतेने हॅट्रिक आमदार मंदा म्हात्रे यांचे अभिनंदन केले.



बेलापूर विधानसभा मतदार संघातील अटीतटीच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार आमदार मंदा म्हात्रे यांनी सलग तीन वेळा निवडून येऊन हॅट्ट्रिक केली. याच अनुषंगाने १५१ बेलापूर विधानसभा क्षेत्रातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी वाशी येथील जनसंपर्क कार्यालय येथे भेट देत आमदार मंदा म्हात्रे यांचे अभिनंदन केले.

या वेळी भाजप सदस्यता नोंदणी अभियान अंतर्गत भाजपाचे सदस्य होण्यासाठी ८८०००२०२४ या क्रमांकावर मिस्डकॉल देऊन राज्यातील, देशातील आणि जगातील सर्वांत मोठ्या राजकीय पक्षाचे सदस्य व्हा, असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी केले.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेविका रुचा पाटील, सामाजिक कार्यकर्ते राजू शिंदे, मुकुंद विश्वासराव, अविनाश भगत, प्रताप भोसकर, रामकृष्ण अय्यर, प्रवीण चिकणे, महेश दरेकर, मालती सोनी, प्रमिला खडसे, क्षितिजा घोरपडे, भाजप कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# जागतिक एड्स जनजागृती दिनानिमित्त रॅली



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण संस्थेच्या एफ.जी. नाईक महाविद्यालयात २ डिसेंबर रोजी जागतिक एड्स जनजागृती दिन साजरा करण्यात आला या दिनाची औचित्य साधून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या माध्यमातून पोस्टर मेकिंग आणि जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला जिल्हा एड्स नियंत्रण विभाग ठाणे संस्थे अंतर्गत आयसीटीसी नागरी आरोग्य केंद्र आयसीटीसी कोपरखैरणे येथील रमा शिंदे (समुपदेशक), जब्बार शेख (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविक पर भाषणात प्राचार्य महाडिक यांनी देशातील एकूणच एड्स रुग्णाची टक्केवारी नमूद केली व त्यानुसार सद्यस्थितीमध्ये एड्सचे प्रमाण वाढत असल्याचे पाहायला मिळत असून यासाठी एड्स जागृती पर कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे आहे. आज समाजामध्ये एड्सबद्दल अज्ञान आहे तर ते अज्ञान दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जनजागृती करून समाजातील हे अज्ञान दूर करावे, असे आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने रॅली सहभागी झाल्याबद्दल प्राचार्यांनी त्यांचे कौतुक केले. रमा शिंदे यांनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आपल्या जीवनात आरोग्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले तसेच विद्यार्थी हा आजच्या समाज जीवनाचा महत्त्वाचा घटक असल्याने विद्यार्थ्यांनी जबाबदारी घेऊन समाजामध्ये एड्ससारख्या रोगाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन करीत निरोगी समाज घडविणे गरजेचे असल्याचे सांगितले.

एड्स जनजागृती दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयात पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. यापैकी एकूण तीन बक्षीस काढण्यात आली. प्रथम क्रमांक सानिया मयेकर एफ. वाय. बी.कॉम, द्वितीय क्रमांक निर्जला गुप्ता टी. वाय. बी. कॉम तसेच तृतीय क्रमांक ओमकार देशमुख एफ.वाय. बी.कॉम. या विद्यार्थ्यांची पारितोषकासाठी निवड करण्यात आली.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, राष्ट्रीय सेवा योजना युनिटचे प्रमुख प्राध्यापक प्रमोद साळुंखे तसेच प्रा. डॉ. कविता पवार तसेच एन.एस.एस कमिटी मेंबर प्रा. चिन्मय वैद्य व प्रा. प्राजक्ता सावंत आणि इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी विशेष सहकार्य केले.

# गव्हाण विद्यालयात एड्स रोग प्रतिबंधात्मक मार्गदर्शन शिबिर

- डॉ. बोरकर दाम्पत्याकडून मुला-मुलींना उद्बोधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून येथील रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना एड्स रोगाविषयी आणि प्रतिबंधाविषयी विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले.

याचप्रमाणे विद्यार्थी व विद्यार्थिनींना त्यांच्या विविध समस्या शारीरिक समस्यां विषयी उलवे येथील सुप्रसिद्ध 'बोरकर मदर्स केअर' या रुग्णालयाचे प्रमुख डॉ.कृष्णा बोरकर व डॉ. सौ.मोना बोरकर या डक्टर दाम्पत्याने विशेष मार्गदर्शन केले. त्यांच्या समवेत डॉक्टर शर्मिला आंब्रे आणि स्वप्निल आदी उपस्थित होते.



या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांचेसह उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विवाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे त्याचप्रमाणे ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

इयत्ता नववी अ या वर्गाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास वर्गशिक्षक शितलकुमार म्हात्रे तसेच ज्युनिअर कॉलेजचे राजेंद्र चौधरी, माणिक घरत, राजू खेडकर, उमेश पाटील, अर्चना पाटील, जयवंती ठाकूर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ.कृष्णा बोरकर व डॉ.मोना बोरकर यांनी विद्यार्थ्यां व विद्यार्थिनींना स्वतंत्र मार्गदर्शन करून विद्यार्थिनींच्या विविध शारीरिक समस्या, मासिक पाळीच्या समस्यांविषयी उदबोधन केले. तत्पूर्वी झालेल्या स्वागत समारंभाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागरकुमार रंधवे यांनी केले तर समारोप समारंभात आभार प्रदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी केले.














पनवेल : विधानसभा निवडणुकीत विजयाचा चौकार मारणारे आमदार प्रशांत ठाकूर आणि या विजयात महत्त्वपूर्ण योगदान देणारे भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्रीवर्धनवासीय पर्यायी रस्त्याच्या प्रतीक्षेत

## ■ शहरासाठी बाह्यरस्ता हवा; पर्यटकांसह स्थानिकांची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन आता नावाजलेले पर्यटन क्षेत्र म्हणून ओळखले जात आहे. पर्यटन क्षेत्रात ब दर्जा प्राप्त झालेल्या श्रीवर्धन येथे समुद्र किनाऱ्यावरील झालेले सुशोभीकरण; त्याचप्रमाणे मुळगाव कोळीवाडा येथे होत असलेला ग्रोयान्स पद्धतीचा बंधारा व जीवना बंदर येथे होत असलेली जेट्टी यामुळे भविष्यात श्रीवर्धन येथील पर्यटनात वाढ होणार आहे. आधुनिकतेकडे जाणाऱ्या श्रीवर्धनची मोठी समस्या झाली आहे ती मुख्य रस्त्यांवरील होणारी वाहतूक कोंडी. दिवसेंदिवस वाढते पर्यटन या दृष्टीने येथील रस्ते अरुंद वाटत असून आता श्रीवर्धन गावात येण्यासाठी लवकरच पर्यायी बाह्य रस्त्याचे नियोजन करण्यात, यावे अशी मागणी पर्यटक आणि स्थानिक लोक करू लागले आहेत.



श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची जन्मभूमी, प्राचीन मंदिरे, तीन किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा अशा ऐतिहासिक व निसर्गरम्य श्रीवर्धन येथे अनेक पर्यटक येत असतात. पर्यटक संख्या वाढली, पण रस्त्यांमध्ये काही बदल झाला नाही. श्रीवर्धन नगर परिषदेची स्थापना ब्रिटिश राजवटीत १८८४ साली झाली तेव्हापासून रस्ते आहेत त्याच परिस्थितीत आहेत. कायम वर्दळीचे आणि वाहतूक कोंडी होणारे रस्ते वाणी आळी, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भगवान महावीर मार्ग, दादर पूल व टिळक रस्ता हे सर्व मुख्य रस्ते पाच ते सहा मीटर रुंदीचे असल्याने या रस्त्यावर हमखास वाहतूक कोंडी निर्माण होते.

श्रीवर्धनची मोठी बाजारपेठ ही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुने बसस्थानक व टिळक मार्गावर आहे. अरूंद रस्ता, त्यातच मुख्य बाजारपेठ या मार्गावर असल्याने कायम येथून मालवाहतूक करणारी वाहने, बाजारपेठेत खरेदीसाठी आलेले ग्राहक व पर्यटकांची वाहने या कारणास्तव अनेकदा वाहतूक कोंडी निर्माण होते.

श्रीवर्धन शहराच्या बाह्य पर्यायी रस्त्यासाठी १९९७ साली विकास आराखड्याप्रमाणे एक किलोमीटर लांबीचा व पंधरा मीटर रुंदीच्या पर्यायी रस्त्याचे नियोजन करण्यात आले होते. शहराचे प्रवेशद्वार श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे कमानीच्या मागील बाजूने रस्ता सुरु होत करदमे बाग येथून जुने बसस्थानकाजवळील पाण्याचा पर्ह्या येथे रस्ता बाहेर पडणार होता. हा मार्ग जर झाला असता तर खासगी वाहने बाह्य पर्यायी रस्त्याने श्रीवर्धन गावात आली असती व मुख्य रस्त्यांवरील होणारी वाहतूक कोंडी टळली असती, परंतु हा बाह्य पर्यायी रस्ता रखडला असून तो प्रत्यक्षात साकारला जावा, अशी मागणी होत आहे.

# रायगडात राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

## पावणे सहा लाख मुला-मुलींना दिल्या जाणार गोळ्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार असून या अंतर्गत एक वर्ष ते १९ वर्ष वयोगटातील पाच लाख ८५ हजार सात मुला-मुलींना बुधवारी (दि.४) जंतनाशक गोळ्या देण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. तीन हजार २४२ शाळा आणि तीन हजार १५१ अंगणवाड्यांमधून जंतनाशक गोळ्या देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जंतनाशक गोळ्या देण्याची मोहीम यशस्वी करण्याकरिता ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आरोग्य उपकेंद्र या ठिकाणी कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका सहभाग घेणार आहेत तसेच शहरी भागामध्ये जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय यांच्यामार्फतही मोहीम राबविण्यात येणार आहे.

### जंतनाशक गोळी खाल्याने होणारे लाभ

जंतनाशक गोळी खाल्ल्याने रक्तक्षय कमी होतो. बालक आजारी पडण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे शाळेतील उपस्थिती वाढते. मुले क्रियाशील बनतात व मुलांची रोगप्रतिकारशक्ती वाढते, आरोग्य चांगले राहते. अल्बेडझोलच्या एका गोळीमुळे जंताचा नाश होण्यास मदत होते.

जंतदोषामुळे बालकांमध्ये ॲनिमियाचा सर्वाधिक धोका उद्‌भवतो, शिवाय आतड्यांना सूज येणे, पोटदुखी, भूक मंदावणे, उलट्या, अतिसार व इतर आजार उद्‌भवतात. या आजारांना आळा घालण्यासाठी वर्षातून दोन वेळा बालकांनी जंतनाशक गोळी घेणे गरजेचे आहे. ज्या मुला-मुलींना कोणत्याही कारणाने ४ डिसेंबर रोजी जंतनाशक गोळी मिळाली नाही, तर त्यांना १० डिसेंबर रोजी मॉप-अप राउंडच्या वेळी गोळी देण्यात येणार आहे. एक वर्ष आतील बालकांना गोळी देण्यात येऊ नये, एक ते दोन वर्षा च्या बालकांना अर्धी गोळी पाण्यातून द्यावी तसेच २ ते १९ वयोगटातील मुलांनी एक गोळी चावून खाल्यानंतर पाणी द्यावे, अशा सूचनाही दिल्या गेल्यात.

या मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे यांनी केले आहे.

# उसर खुर्द विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बांधला वनराई बंधारा

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्दच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत नदीवर वनराई बंधारा बांधला. या वनराई बंधाऱ्यामुळे लगतच्या हंगामी शेतीसाठी तसेच वन्यप्राणी व गाईगुरांसाठी मार्च महिन्यापर्यंत पाणी उपलब्ध राहणार आहे. त्याच पद्धतीने भूजल पातळी वाढण्यासाठी या वनराई बंधाऱ्याचा निश्चितपणे उपयोग होणार आहे.

ग्रामस्थ, वन्यप्राणी व पर्यावरणासाठी उपयुक्त असलेला हा वनराई बंधारा विद्यार्थ्यांनी बांधल्यामुळे त्यांचे पंचक्रोशीतून कौतुक करण्यात येत आहे. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे, उसर गावचे अध्यक्ष एकनाथ गुजर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून बंधाऱ्याची सुरुवात करण्यात आली. सर्व ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

ग्रामस्थ मंडळींनी मुलांना खाऊ दिला व सहकार्य केल्याबद्दल मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांनी सर्व ग्रामस्थ, सिमेंट पिशव्या दिल्याबद्दल ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांचे आभार व्यक्त केले.



### श्रीवर्धनमध्ये एकाची हत्या

**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**


श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीतील कुंदन रेसिडेन्सी या इमारतीमध्ये एका रहिवाशाची हत्या करण्यात आली आहे. रामदास गोविंद खैरे असे मयत व्यक्तीचे नाव असून ते ७२ वर्षांचे होते.

रामदास खैरे दोन दिवसांपासून फोन उचलत नसल्यामुळे त्या ठिकाणी नातेवाईकाला जाऊन पाहण्यास सांगितले असता हत्येची बाब लक्षात आली. त्यांच्या फ्लॅटला बाहेरून कडी लावण्यात आलेली होती, असेदेखील समजते. याबाबत प्रज्योत चरण जाधव यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खैरे हे युनियन बँकेतून सेवानिवृत्त झालेले होते. कुंदन रेसिडेन्सीमधील फ्लॅटमध्ये अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून कोणत्यातरी साधनाने त्यांच्या डोक्यात वार करून त्यांची हत्या केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहे.

# माजी मंत्री कै. प्रभाकर मोरे यांच्या जयंतीनिमित्त पोलादपूरमध्ये रक्तदान शिबिर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोलादपूर येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये संस्थापक व महाराष्ट्राचे ग्रामविकास माजी ग्रामविकास मंत्री कै प्रभाकर मोरे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर नुकतेच झाले.



महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन विभाग यांच्या विद्यमाने आयोजित या शिबिराला महाड येथील जनकल्याण रक्तपेढी व एचडीएफसी बँक, पोलादपूर व महाड शाखा यांचे विशेष सहकार्य लाभले.

प्रारंभी शिवाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे, सचिव अशोक देशमुख यांनी कै. प्रभाकर मोरे व धन्वंतरी प्रतिमेचे पूजन करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनील बलखंडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. राम बरकुले व डॉ. नाथिराम राठोड, अधीक्षक मुकुंद पंदेरकर यांनी संस्थेचे विश्वस्त तसेच जनकल्याण रक्तपेढीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रूचिता गावडे, रक्तपेढीचे संचालक डॉ. समीर बुटाला, पीआरओ रविकांत शिंदे व अन्य सर्व स्टाफ मेंबर्सचे स्वागत केले.

या वेळी मनोगतामध्ये अध्यक्ष ॲड. संतोष काळे यांनी, स्व.प्रभाकर मोरे यांच्या प्रयत्नातून स्थापन झालेल्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा थोडक्यात आढावा घेऊन रक्तदान, वृक्षारोपण यांसारख्या विविध सामाजिक कार्यक्रमांमधून कै. प्रभाकर मोरे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची परंपरा यापुढेही महाविद्यालयाने कायम जतन करावी, असे आवाहन करून रक्तदान शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

एचडीएफसी बँकेचे व्यवस्थापक मंगेश घुले, स्वप्नील पालांडे, भूषण म्हात्रे व संदेश यांनी रक्तदान शिबिरास भेट देऊन रक्तदात्यांना अभिनंदन पत्राचे वितरण केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी माजी विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक, पत्रकार शैलेश पालकर व सचिन मेहता आदींनी रक्तदाता म्हणून सहभाग नोंदवला. या शिबिरामध्ये ३५ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आल्याचे जनकल्याण रक्तपेढीतर्फे सांगण्यात आले.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन विभागातील शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सुरेश मोरेंचा अभीष्टचिंतन, पुस्तक प्रकाशन सोहळा

**चौक : प्रतिनिधी**

ज्यांचे मार्गदर्शन गाव स्वीकारतो त्यांचे नेतृत्व समाज स्वीकारतो. समाजाची सेवा अतिशय प्रामाणिकपणे केल्यामुळेच सुरेशनानांसारखे नेतृत्व समाज मान्य निर्माण होते, असे गौरवोद्गार ज्येष्ठ सनदी अधिकारी जी.व्ही. काळे यांनी काढले.



अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाचे माजी अध्यक्ष, कोयना प्रकल्प जनतेचे नेते, कोयना क्षत्रिय मराठा समाज माजी अध्यक्ष व निवृत्त लेखापाल, निर्मल ग्राम पुरस्कार विजेते सुरेश भाऊराव मोरे यांच्या ८८व्या वाढदिवसाचे अभिष्टचिंतन सोहळा आणि त्यांनी लिहिलेल्या त्या स्मृतींच्या गंधकोषी पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्या वेळी काळे बोलत होते.

ते पुढे म्हणाले वयाच्या ८८व्या वर्षी लेखन करणे म्हणजे सामान्य माणसासाठी केलेल्या कामांची ऊर्जा आहे. या वेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी सुरेश मोरे यांच्या जीवन कार्याचा उलगडा केला. कुटुंबाच्या त्यागातून सुरेशनानांचे नेतृत्व उदयास आले. त्यामुळे त्यांच्या यशात कुटुंबाचा वाटा आहे, असे प्रतापराव शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष प्रतापराव शिंदे, कोकण विकास समितीचे अध्यक्ष जयंत दरेकर, चिपळूणचे माजी सभापती बळीराम शिंदे, ज्येष्ठ निरूपणकार हभप सुरेशबुवा कदम, कोयना प्रकल्पग्रस्त संघाचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, अर्जुन पुरस्कार प्राप्त विजेते आणि भारतीय कबड्डी संघाचे माजी कर्णधार अशोक शिंदे, कोयना प्रकल्पग्रस्त नेते बळीराम शिंदे, उद्योगपती जगन्नाथ मोरे, रमेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सोनवणे, दसपटी क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अरुण शिंदे, अरविंद मोरे, विलास कदम, अशोक मोरे, जयवंत कदम यांच्यासह रायगड, ठाणे, पालघर, सातारा, रत्नागिरी जिल्ह्यातील सगेसोयरे आणि कोयना प्रकल्पग्रस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय मोरे यांनी केले.

# राजपुरी येथे पर्यटकांची वाहने पार्किंग झोनमध्येच उभी केली जावीत

## अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील राजपुरी येथे असणारा प्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शेकडोच्या संख्येने पर्यटक येत असतात, मात्र पर्यटक आपली वाहने जेथे कायदेशीर पार्किंग झोन निर्माण केला आहे तिथे पार्क न करता तिकीट वितरण व्यवस्था व जलवाहतुकीकडे जाणाऱ्या रस्त्यावरच पार्क केली जात आहेत. हे साफ चुकीचे असून बंदर निरीक्षक यांनी तातडीने पर्यटकांची वाहने पार्किंग झोनमध्ये उभी करून घ्यावी; अन्यथा जनआंदोलन छेडण्याचा इशारा मुरूड तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी दिला आहे.



राजपुरी येथे ज्या ठिकाणी पर्यटक उभे राहतात त्या जलवाहतूक करण्याच्या रस्त्यावर वाहने उभी केल्याने पर्यटकांनाच सावली न मिळता कडक उन्हात उभे राहावे लागत आहे. प्रत्यक्षात वाहनतळास मोठी जागा उपलब्ध असतानासुद्धा त्याचा पूर्ण क्षमतेने वापर होत नाही. याबाबत प्रवासी संघटनेमार्फत आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. प्रवासी संघटनेचे अध्यक्ष सुर्वे यांनी पाहणी करून बंदर निरीक्षक सतीश देशमुख यांची भेट घेऊन हा प्रकार दाखवून दिला आहे. यावर बंदर निरीक्षकांनी लवकरच हा मार्ग मोकळा करून दिला जाईल व जिथे वाहन पार्किंगची जागा आहे त्याच ठिकाणी वाहने उभी केली जातील असे आश्वासन दिले आहे. पुढील शनिवार, रविवारपर्यंत जर ही व्यवस्था करण्यात आली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा सुर्वे यांनी दिला आहे.


# घाटमाथ्यावरील मेंढपाळ कुटुंब कबिल्यासह कोकणात दाखल

**पाली : प्रतिनिधी**

दिवाळीनंतर घाटमाथ्यावरील विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील मेंढपाळ चारा-पाण्यासाठी कोकणात दाखल होतात. कुटुंब कबिल्यासह ते रायगड जिल्ह्यासह कोकणातील विविध भागात येवून थांबतात व पुढील सहा महिने कोकणात मुक्काम करून पुन्हा आलेल्या मार्गी आपल्या मूळ गावी प्रस्थान करतात. सध्या येथील शेती, माळरानावर आपले बिऱ्हाड घेऊन भटकंती करताना मेंढपाळ दिसून येत आहेत, तर शेतकऱ्यांकडून त्यांना काही पैसे देऊन शेळ्या-मेंढ्यांना शेतामध्ये बसविल्या जात आहेत. याला कारवणी पद्धत असे म्हणतात.

पुणे, साताऱ्यातील काही दुष्काळग्रस्त भागातून अनेक मेंढपाळ नोव्हेंबरच्या सुमारास रायगड जिल्ह्यात दाखल होतात. आता पाली सुधागड येथील अनेक शेतात मेंढपाळ डेरेदाखल झाले आहेत. त्यांच्या शेळ्या-मेंढ्यांना येथील माळरानावर मुबलक असा चारा-पाणी मिळत आहे. घाटमाथ्यावरील दुष्काळी भागात पाणी नसल्यामुळे शेती करता येत नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी कोकणात यावे लागते, असे या मेंढपाळांनी सांगितले.

रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीची सुपिकता कमी होऊ लागल्याने सेंद्रिय पद्धतीने शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे कोकणात पूर्वीपासून चालत आलेली शेतात शेळ्या-मेंढ्या बसविण्याची कारवणी पद्धत आजही टिकून आहे. जिल्ह्याच्या खलाट पट्ट्यातील मेंढपाळ आपल्या फौजफाट्यासह कारवाणीसाठी गावोगाव दाखल होऊ लागले आहेत. पूर्वमशागतीसाठी पूर्वीच्या काळी रासायनिक खते नसल्याने लोक सेंद्रिय पद्धतीने शेती करीत असत. शेण व पालापाचोळ्यापासून बनविलेले खत शेतीसाठी वापरत असत, परंतु जसजशी शेती तंत्रज्ञानात प्रगती होत गेली तसतशी रासायनिक खते उपलब्ध होत गेली. रासायनिक खतांमुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होत गेली. हे खरे असले तरी या खतांचा बेसुमार वापर होऊ लागल्याने त्याचा विपरीत परिणाम जमिनीच्या सुपिकतेवर होऊ लागला. त्यामुळे अलीकडे सेंद्रिय शेतीवर भर दिला जात आहे.



### कारवणी पद्धत आजही टिकून

जमिनीची सुपिकता वाढविणारी कारवणी पद्धत पूर्वीपासूनच कोकणात आहे. साधारणपणे हिवाळा सुरू झाला की, मेंढपाळ आपल्या शेळ्या-मेंढ्यांचा फौजफाटा घेऊन गावोगावी भटकंती करीत असतात. शेतकरी आपल्या शेतात या शेळ्या-मेंढ्या बसवून घेतात. त्यांचे मलमूत्र शेतात पडते. त्याला कारवणी म्हणतात. त्याने शेतीची सुपिकता वाढत असल्याचे शेतकरी सांगतात.

शेतीबरोबरच फळबागांना हे खत वापरले जाते. या खतामुळे जमिनीचा पोत सुधारत असल्याने कारवणीसाठी शेतकरी आग्रही असतात. एका रात्री शेळ्या-मेंढ्या शेतात बसविण्यासाठी तांदूळ किंवा पैसे अशी त्यांची बिदागी असते. त्यांच्याजवळ असलेल्या गावठी अंड्यांनाही विशेष मागणी असते. पाऊस पडेपर्यंत हे मेंढपाळ गावोगावी भटकंती करीत असतात. त्यातून त्यांच्या उदरनिर्वाहाबरोबरच शेळ्या-मेंढ्यांच्या चाऱ्यांचा प्रश्न सुटतो. यात हजारो रुपयांची उलाढालही होत असते.

शेळ्या-मेंढ्यांसोबत शेतातच संसार करीत मेंढपाळांना प्रचंड मेहनत करावी लागते. थंडी, वारा, कडाक्याचे ऊन सहन करीत ते गावोगावी भटकंती करीत असतात. पावसाळा सुरू होण्याअगोदर ते आपल्या घरी परततात. एकेक मेंढपाळांकडे २०० ते २५० मेंढ्या असतात. एक मेंढी सरासरी तीन ते चार हजाराला खासगी वा बाजारात विकली जाते. शिवाय दीडशे ते दोनशे मेंढ्या बाळगताना २५ ते ३० किलो लोकर विक्री होत असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय, बागायतदारांच्या शेतात मेंढ्या रात्रभर बसवल्यास खर्ची म्हणून मेंढपाळांना पुरेसे पैसे दिले जातात. भात पिकविणारे शेतकरी तांदूळही देऊ करतात.

शेळ्या-मेंढ्यांना रात्रीचे संरक्षण कवच म्हणून दिमतीला चार ते पाच तगडी कुत्रीही मेंढपाळांकडून पाळली जातात. एका गावातून दुसऱ्या गावात संसार वाहून नेण्यासाठी घोडेही उपयोगी ठरतात. अंथरूण, पांघरूण व कोंबड्यांची खुराडी, लहान मुले घोड्यावर लादून दरकोस दर मुक्काम असा प्रवास त्यांचा सुरू असतो. दरवर्षी कोकणात डिसेंबर ते मेअखेरपर्यंत मेंढपाळांची भटकंती ही तळकोकणात सुरू असते.

# भारतीय संघाचा दणदणीत विजय

## अंडर १९ आशिया चषकात जपानचा पराभव

**शारजाह : वृत्तसंस्था**

१९ वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत जपानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघाने मोठा विजय मिळवला आहे. नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना कर्णधार मोहम्मद अमान याने ११८ चेंडूत केलेली १२२ धावांची खेळी आणि आयुष म्हात्रे ५४(२९) आणि केपी कार्थिकेया ५७(४९) यांच्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर भारतीय संघाने निर्धारित ५० षटकात ६ बाद ३३९ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना जपानचा संघ ८ बाद १२८ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

भारतीय डावाची सुरुवात करताना आयुष म्हात्रेने आक्रमक अंदाजात डावाची सुरुवात केली. दुसऱ्या बाजूला वैभव सूर्यवंशीही त्याला साथ देताना दिसून



आला. पहिल्या विकेटसाठी सलामी जोडीने ४४ चेंडूत ६५ धावांची खेळी केली. आयुषने २९ चेंडूत सहा चौकार आणि चार षटकाराच्या मदतीने ५४ धावांची कडक खेळी केली.

केपी कार्थिकिया यानेही कॅप्टनला उत्तम साथ दिली. त्याने ४९ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. याशिवाय वैभव सूर्यवंशी २३ (२३), आंद्रे सिद्धार्थ ३५ (४८), निखिल कुमार १२ (१७) आणि हार्दिक राजने अखेरच्या षटकात तुफान फटकेबाजीचा नजराणा पेश करताना १२ चेंडूत २५ धावा ठोकल्या. भारतीय संघाने निर्धारित ५० षटकात ६ बाद ३३९ धावा करत जपानसमोर ३४० धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावांचा पाठलाग करताना जपानच्या संघाला ५० षटकांत ८ बाद १२८ धावांपर्यंतच मजल मारता आली. जपानविरुद्धच्या सामन्यातील विजयासह भारतीय संघाने स्पर्धेतील पहिला विजय नोंदवला आहे.

### असे असेल सेमीचे समीकरण

आता युवा टीम इंडिया 'अ' गटातील साखळी फेरीतील आपला शेवटचा सामना युएईविरुद्ध खेळताना दिसेल. दुसऱ्या सामन्यात भारतीय संघानं मोठ्या फरकाने विजय मिळवला असला तरी गुणतालिकेत भारतीय संघ पाकिस्तान, युएई यांच्यानंतर तिसऱ्या स्थानावर आहे. या गटात जपानच्या संघाने दोन्ही सामने गमावले असल्यामुळे ते स्पर्धेतून बाद झाले आहेत. दुसरीकडे पाकिस्तानच्या संघाने दोन्ही सामने जिंकून सेमीतील आपले स्थान पक्के केले आहे. भारतीय संघाने आता युएईला नमवल्यास त्यांचा सेमीचा मार्ग मोकळा होईल.

# राज्यस्तरीय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत नांदगाव विद्यालयाचे विद्यार्थी चमकले

**मुरूड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज नूतन विद्यालय नांदगावच्या विद्यार्थ्यांनी वर्धा येथे झालेल्या २५व्या राज्यस्तरीय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत चमकदार कामगिरी करीत पाच सुवर्ण व दोन रौप्य अशी सात पदके पटकावली.

या स्पर्धेसाठी रायगड डिस्ट्रिक्ट सिकई मार्शल आर्टच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज नूतन विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले. यात रेश्मा मंगेश भोईर (मजगाव) दोन सुवर्णपदके, काव्या केतन नाक्ती (खार मजगाव) एक सुवर्ण व एक रौप्यपदक, ध्रुव शिल्पा




कळके (मजगाव) व अमोघ समित दळवी (नांदगाव) यांनी प्रत्येकी एक सुवर्णपदक, तर आर्यन स्वप्नील गद्रे (नांदगाव) याने एक रौप्यपदक जिंकले.

विजेत्या खेळाडूंना नांदगाव येथील प्रसिद्ध कराटे मास्टर विजय चंद्रकांत तांबडकर (नववी डिग्री आयसीएस) यांचे मार्गदर्शन लाभले असून शाळेत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि क्रीडाप्रेमीकडून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



# खोपोलीत बॅडमिंटन स्पर्धेला प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील किक-फ्लिक स्पोर्टस् अरेना यांच्या वतीने खोपोली पोलीस ठाण्याच्या प्रांगणातील शहीद अशोक कामठे बॅडमिंटन हॉल येथे रविवारी (दि.१) पुरुषांच्या खुल्या गटातील दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील २५ संघांनी सहभाग घेत प्रतिसाद दिला.

स्पर्धेत प्रथम क्रमांक अक्षय भिंगरी व तुषार मुने खोपोली यांनी पटकावला आहे. द्वितीय क्रमांक रोह्याच्या महेश मोरे व अनिरुध्द कारलेब यांनी, तर तृतीय क्रमांक खोपोलीचे आर्यन देशपांडे व तेजस केलबैकर यांनी प्राप्त केला.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास प्रमुख अतिथी म्हणून खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक मनोज ठाकरे, निरीक्षक शीतल राऊत, किक-फ्लिक स्पोर्टस् अरेना संस्थेचे पदाधिकारी तसेच खेळाडू व क्रीडा रसिक उपस्थित होते.

## जलतरणपटू मोहित म्हात्रेला राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक

**उरण : वार्ताहर**



उरण नेव्हल डेपो येथील नेव्ही चिल्ड्रन स्कूलमधील मोहित संदीप म्हात्रे या महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या तरुण जलतरणपटूने १४ वर्षाखालील मुलांच्या गटात ५० मीटर बॅकस्ट्रोक स्पर्धेत रौप्यपदक जिंकून आपल्या राज्याचा गौरव केला आहे. गुजरातमधील राजकोट येथे स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाद्वारे आयोजित प्रतिष्ठित ६८व्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेदरम्यान मोहितने हे यश मिळाले.

या स्पर्धेत देशभरातील अव्वल तरुण जलतरणपटूंचा सहभाग होता. आपल्या यशाबद्दल बोलताना मोहितने त्याचे प्रशिक्षक, कुटुंब आणि शाळेने केलेल्या अतूट पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली तसेच हे पदक एक स्वप्न असून ते आज सत्यात उतरले आहे आणि मी भविष्यातील स्पर्धांसाठी आणखी कठोर प्रशिक्षण घेण्यास प्रेरित आहे, असे सांगितले. या यशाबद्दल मोहितचे अभिनंदन होत आहे.

# सराव सामन्यात भारताची बाजी | हर्षित राणाची भेदक गोलंदाजी

**कॅनबेरा : वृत्तसंस्था**

कॅनबेरा येथे रविवारी झालेल्या सराव सामन्यात भारताने शानदार विजयाची नोंद केली. टीम इंडियाने पीएम इलेव्हनचा सहा विकेट्सने पराभव केला. भारताकडून शुबमन गिलने दमदार कामगिरी करत अर्धशतक झळकावले, तर वॉशिंग्टन सुंदरने ४२ धावांची स्फोटक खेळी खेळली. हर्षित राणाने अप्रतिम गोलंदाजी करताना सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या.

या सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द करण्यात आला, तर दुसऱ्या दिवसाच्या खेळात दोन्ही संघांनी ४६-४६ षटके खेळण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर हर्षित राणाने भेदक गोलंदाजी करत यजमान संघाला आपल्या पुढे गुडघे टेकायला भाग पाडले. भारतीय गोलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियन पीएम इलेव्हन संघ ४३.२ षटकात २४० धावांवरच गारद झाला. या सामन्यात भारतीय संघाच्या गोलंदाजीत हर्षित राणाने अप्रतिम कामगिरी करत एकूण



चार विकेट्स आपल्या नावावर केल्या.

हर्षितने सहा षटके गोलंदाजी करताना ४४ धावा देत चार विकेट्स घेतल्या. यादरम्यान राणाने आपल्या शानदार गोलंदाजीने दोन फलंदाजांना त्रिफळचीत केले. राणाने जॅक क्लेटन, ऑलिव्हर डेव्हिस, जॅक एडवर्ड्स आणि सॅम हार्पर यांना तंबूचा रस्ता दाखवला. यानंतर भारतीय संघ फलंदाजीसाठी उतरला. टीम इंडियाने ४६ षटके फलंदाजी करत चार विकेट गमावून २५७ धावा केल्या. भारताची धावसंख्या ऑस्ट्रेलियापेक्षा जास्त होती. त्यामुळे टीम इंडियाला या सामन्यात विजयी घोषित करण्यात आले.

हर्षित राणाव्यतिरिक्त आकाश दीपलाही दोन दिवसीय सराव सामन्यात गोलंदाजी करण्याची संधी मिळाली, ज्यात त्याने दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय मोहम्म सिराज, प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनीही प्रत्येकी एक विकेट्स घेतली. या सामन्यात रविचंद्रन अश्विनला गोलंदाजी करण्याची संधी मिळाली नाही. अशा प्रकारे हर्षित राणाव्यतिरिक्त आकाश दीपने आपल्या धारदार गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

टीम इंडियाच्या विजयात दोन खेळाडूंनी महत्त्वाची भूमिका बजावली. हे दोन खेळाडू दुसरे कोणी नसून शुबमन गिल आणि हर्षित राणा आहेत. या दोन्ही खेळाडूंनी या सामन्यात अप्रतिम कामगिरी केली. सामन्याच्या पहिल्या डावात हर्षित राणाची गोलंदाजी अप्रतिम होती. सामन्याच्या पहिल्या डावात राणाने सहा षटकांत ४४ धावा देत चार विकेट्स घेतल्या. यानंतर शुबमनने धावांचा पाठलाग करताना अर्धशतक झळकावले. या सामन्यात गिलने ६२ चेंडूत ५० धावा केल्या. दुसरीकडे जैस्वालनेही ४५ धावांची खेळी केली.

# विंडीज गोलंदाजाचा भेदक स्पेल; ४६ वर्षांचा विक्रम मोडला



**किंग्स्टन : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्ध किंग्स्टनमध्ये खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजच्या जयडेन सील्सने दमदार गोलंदाजी करत सर्वांचे लक्ष वेधले आहे. विशेष म्हणजे कसोटी क्रिकेटच्यामध्ये गेल्या ४६ वर्षात पहिल्यांदाच हा पराक्रम करण्यात आला आहे. जयडेन सील्सच्या भेदक गोलंदाजीमुळे बांगलादेशचा संघ दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात २०० धावांचा टप्पाही गाठू शकला. त्याने भारतीय गोलंदाज उमेश यादवचा विक्रम मोडून बांगलादेशविरुद्ध इतिहास रचला आहे.

जयडेन सील्सने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या डावात १५.५ षटके गोलंदाजी करताना १० षटके निर्धाव टाकत पाच धावा देत चार विकेट्स घेतल्या. या दरम्यान त्याची इकॉनॉमी ०.३१ होती, जी १९७८नंतर पुरुषांच्या कसोटी क्रिकेटमध्ये नोंदवलेली सर्वोत्तम इकॉनॉमी आहे. यापूर्वी हा विक्रम भारतीय वेगवान गोलंदाज उमेश यादवच्या नावावर होता, ज्याने २०१५मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटीत ०.४२च्या इकॉनॉमीसह गोलंदाजी केली होती. उमेशने २१ षटकांतील १६ षटके निर्धाव टाकत आणि नऊ धावा देत तीन विकेट्स घेतल्या, पण आता उमेश यादवचा हा विक्रम आता जयडेन सील्सने मोडला आहे.

# अलिबागच्या सिकाई मार्शल आर्ट खेळाडूंचे सुयश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वर्धा येथे झालेल्या २५व्या सिकाई मार्शल आर्ट राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत अलिबागच्या पाच खेळाडूंनी रायगडसाठी खेळत सात सुवर्णपदके पटकावली.

१४ वर्षाखालील ३७ किलो गटात लोबा (फाईट) तसेच ग्रुप खवणके प्रकारात ऋग्वेद विकास नाईक याने सुवर्णपदक पटकावले. ४१ किलो गटात लोबा तसेच (फाईट) अरो प्रकारात देवदत्त मनीष पडवळ याने सुवर्णपदक जिंकले. १८ वर्षाखालील ४० किलो गटात लोबा (फाईट) प्रकारात शिव देवजी हिलम याने सुवर्णपदक प्राप्त केले. सिनियर ६२ किलो गटात लोबा (फाईट) प्रकारात वेदांत संदेश सुर्वे याने आणि ओपन



वजनी गटात लोबा (फाईट) प्रकारात शुभम महेंद्र नखाते याने सुवर्णपदक पटकावले.

या सर्व खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील खेळांसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. त्यांना मास्टर विजय चंद्रकांत तांबडकर व प्रियंका संदेश गुंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले. सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# क्रेग ब्रेथवेटने टाकले गॅरी सोबर्सला मागे

**जमैका : वृत्तसंस्था**



वेस्ट इंडिज आणि बांगलादेश यांच्यात जमैकामध्ये कसोटी मालिकेतील दुसरा सामना खेळला जात आहे. विंडीज संघाचा कर्णधार क्रेग ब्रेथवेटने या सामन्याच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये सामील होताच एक मोठा पराक्रम केला आहे. त्याने महान फलंदाज गॅरी सोबर्सचा मोठा कसोटी विक्रम मोडला. खरेतर क्रेग ब्रेथवेटने वेस्ट इंडिजसाठी सलग सर्वाधिक कसोटी सामने खेळण्याचा गॅरी सोबर्सचा ५२ वर्षांचा जुना विक्रम मोडला.

आपल्या देशासाठी सलग सर्वाधिक कसोटी सामने खेळण्याच्या बाबतीत गॅरी सोबर्सला मागे टाकून ब्रेथवेट नंबर वन ठरला आहे. सध्याचा सामना हा ब्रेथवेटचा ८६वा कसोटी सामना आहे. सोबर्स यांनी एप्रिल १९५५ ते एप्रिल १९७२पर्यंत ८५ कसोटी सामने खेळले होते. डेसमंड हेन्स (७२), ब्रायन चार्ल्स लारा (६४), रोहन कन्हाई (६१), सर विव्ह रिचर्ड्स (६१) आणि कोर्टनी वॉल्श (५३) यांचाही या यादीत समावेश आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये सलग सर्वाधिक सामने खेळण्याचा विश्वविक्रम इंग्लंडचा माजी कर्णधार लिस्टर कुकच्या नावावर आहे. मे २००६ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीत त्याने १५९ कसोटी सामने खेळले आहेत.



## तायक्वांडो स्पर्धेत पार्थ कदमला 'सुवर्ण'

**चौक : प्रतिनिधी**

खारघर येथे झालेल्या रॅडक्लिफ तिसऱ्या तायक्वांडो चॅम्पियनशिप स्पर्धेत पार्थ सतीश कदम याने सुवर्णपदक जिंकले.

रेडीफ्लिक तिसरी तायक्वांडो चॅम्पियन स्पर्धा खारघर येथे झाली. या स्पर्धेत खालापूर तालुक्यातील वावंढळ येथील पार्थ सतिश कदम याने भाग घेतला होता. त्याने तिसऱ्या फेरीत सुवर्णपदक पटकावले. त्याचे अभिनंदन होत आहे.

# मार्को यान्सनने मोडला व्यंकटेश प्रसादचा विक्रम



**डर्बन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने पहिल्या कसोटी सामन्यात श्रीलंकेवर २३३ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात २४ वर्षीय मार्को यान्सन दक्षिण आफ्रिकेच्या विजयाचा सर्वात मोठा हिरो ठरला. त्याने केलेल्या भेदक आणि धारदार गोलंदाजीसमोर श्रीलंकेच्या फलंदाजांना तग धरता आला नाही. त्यामुळे मार्कोच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकन संघ शानदार पद्धतीने विजय मिळवण्यात यशस्वी ठरला. यासह मार्को यान्सनने या सामन्यात अनेक मोठे विक्रम मोडीत काढले.

दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका यांच्यातील सामना डर्बनच्या किंग्समीड मैदानावर खेळला गेला. या कसोटीच्या पहिल्या डावात मार्को यान्सनने केवळ १३ धावा दिल्या आणि सात विकेट्स घेतल्या. त्याच्या आधी श्रीलंकेची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली होती आणि संघ अवघ्या ४२ धावांवर गडगडला होता. यानंतर दुसऱ्या डावात त्याने चार विकेट्स घेतल्या.

मार्को यान्सनने अशा प्रकारे दोन्ही डावात एकूण ११ विकेट्स घेत मोठा विक्रम केला. तो डर्बनच्या मैदानावर कसोटी सामन्यात सर्वाधिक विकेट्स घेणारा संयुक्त दुसरा गोलंदाज ठरला. त्याने मुथय्या मुरलीधरनची बरोबरी केली. मुरलीधरनने २०००मध्ये डर्बन कसोटीत ११ विकेट्स घेतल्या होत्या. त्याचबरोबर मार्को यान्सनने भारताच्या व्यंकटेश प्रसादचा २८ वर्षे जुना विक्रम मोडला आहे. व्यंकटेशने १९९६मध्ये डर्बन येथे झालेल्या कसोटी सामन्यात एकूण १० विकेट्स घेतल्या होत्या.

# बुद्धीबळ स्पर्धेत महापारेषणने पटकाविले कांस्यपदक

**मुंबई : प्रतिनिधी**

बडोदा (गुजरात) येथे ४६व्या ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डातर्फे घेण्यात आलेल्या बुद्धीबळ व बॅडमिंटन स्पर्धेत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) महिला बुद्धीबळ संघाने कांस्यपदक मिळविले. या यशाबद्दल महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी महिला संघाचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला.

यामध्ये ४०० के.व्ही. लोणीकंद-२ पुणे येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता मनिषा देसाई, सांघिक कार्यालय मुंबईच्या सहाय्यक अभियंता श्रद्धा वर्डीकर, अति उच्च दाब प्रकल्प मंडळ पुणे येथील विदुला देवकते, २२० के.व्ही. शेंद्रा उपकेंद्र छत्रपती संभाजीनगर येथील सहायक अभियंता हर्षदा जाधव, नागपूर येथील ममता



भोयर यांनी महिला बुद्धीबळ स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले.

महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे म्हणाले, महापारेषण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी नेहमीच स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपले टीम स्पिरीट दाखवितात. विशेषतः महिला अधिकाऱ्यांनी केलेली ही कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. घर, कार्यालय सांभाळून त्यांनी मिळविलेले हे यश अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीही प्रेरणादायी आहे. भविष्यातही दैनंदिन कामकाज सांभाळून महिलांनी मोठे यश प्राप्त करावे.

महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर सर्व महिला अधिकाऱ्यांचा सत्कार महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी करून त्यांना भेटवस्तू दिली. या वेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी महेश आंबेकर, रेणुका नाटके उपस्थित होते. पुण्याचे अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संदीप हाके, प्रशिक्षक किशोर चौधरी यांचे महिलांना विशेष मार्गदर्शन लाभले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com